विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र

दैनिक **यशवंत**

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/सोमवार दि. २० मे २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१८४ ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦

**सुविचार**

जब लोग आपको न समझने के कारण आपकी बात नहीं सुनते हैं, तब परमात्मा आपका साथ देते हैं ।

# काँग्रेस म्हणजे भ्रष्टाचाराची जननी

जमशेदपूर : झारखंडमधील जमशेदपूरमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेस आणि झारखंड मुक्ती मोर्चावर जोरदार हल्लाबोल केला. काँग्रेस ही भ्रष्टाचाराची जननी आहे. काँग्रेस आणि झामुमोसारख्या पक्षांनी झारखंडला लुटण्याची एकही संधी सोडली नाही. काँग्रेस ही भ्रष्टाचाराची जननी आहे. काँग्रेस आणि झामुमोच्या लोकांना विकासाची फिकीर नाही. त्यांचा संबंध फक्त भ्रष्टाचार आणि खोटे बोलण्याशी आहे. काँग्रेस आणि झामुमोने आपल्या घरात काळ्या पैशाचा ढीग ठेवला आहे, अशा शब्दांत पंतप्रधान मोदींनी त्यांच्यावर टीकेचा भडीमार केला.



पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले की, काँग्रेस आणि झामुमोच्या लोकांना विकासाचा एबीसीडी सुद्धा माहित नाही. गरिबांच्या मालमत्तेचा एक्स-रे काढणे, एससी-एसटी-ओबीसीचे आरक्षण हिसकावणे, मोदीजींना रोज शिव्या देणे हे त्यांचे काम आहे. या पलीकडे ते विचार करू शकत नाहीत.

झारखंडमध्ये झामुमोने जमीन घोटाळा केला. त्यांनी गरीब आदिवासींच्या जमिनी बळकावल्या, लष्कराच्या जमिनी बळकावल्या. त्यांच्या घरातून जप्त झालेल्या चलनी नोटांचे डोंगर तुमच्याकडून लुबाडलेले आहेत. या अप्रामाणिक लोकांच्या घरात दडवून ठेवलेला पैसा आता मोदी शोधून काढतोय. मी हे पैसे सरकारी तिजोरीत नेण्यासाठी वसूल करत नाही तर मी हे सर्व पैसे ज्यांच्या मालकीचे आहेत, त्या गरीब लोकांना परत करण्याचा मार्ग शोधत आहे. ही मोदींची गॅरंटी आहे, असा विश्वास त्यांनी लोकांना दिला.

काँग्रेस पक्ष उद्योजकांना देशाचे शत्रू मानतो. जे उद्योगपती त्यांना पैसे देत नाहीत, त्यांच्यावर ते हल्ला करतात, म्हणजेच काँग्रेस आणि झामुमोसारख्या पक्षांना देशातील उद्योगांची **(पान २ वर)**

# पतंजलीच्या उत्पादनाचा दर्जा निकृष्ट

## सोनपापडी गुणवत्ता चाचणीत फेल, तिघांना तुरुंगवास

नवी दिल्ली : फसव्या जाहिरातींप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाच्या दणक्यामुळे पतंजली कंपनीचे संस्थापक रामदेव बाबा आणि बाळकृष्ण अडचणीत आले आहेत. सर्वोच्च न्यायालयाने खडसावल्यानंतर आता पतंजली कंपनीची सोनपापडी गुणवत्ता चाचणीत अनुत्तीर्ण झाल्यामुळे उत्तराखंडमधील पिथोरागडच्या न्यायदंडाधिका-यांनी पतंजली आयुर्वेद लिमिटेड कंपनीच्या सहाय्यक व्यवस्थापकासह तीन जणांवर कारवाई केली आहे. तिघांनाही सहा महिन्यांचा कारावास आणि दंड अशा स्वरुपाची कारवाई करण्यात आली आहे.

पाच वर्षांपूर्वी, १७ ऑक्टोबर २०१९ रोजी अन्न सुरक्षा निरीक्षकांनी पिथोरागडच्या बेरीनागमधील मुख्य बाजारपेठेतील लीलाधर पाठक यांच्या दुकानाला भेट दिली होती. त्यावेळी त्यांनी या दुकानातील काही खाद्यपदार्थांची तपासणी केली. या तपासणीनंतर त्यांनी दुकानातील ङ्गपतंजली नवरत्न इलायची सोनपापडीफ्बाबत चिंता व्यक्त केली होती. त्यानंतर दुकानातील सोनपापडीचे काही नमुने त्यांनी गोळा केले. यासह रामनगर येथील ङ्गकान्हा जीफ



या वितरकाला (पतंजली सोनपापडीचे वितरक) आणि पतंजली आयुर्वेद लिमिटेड यांना नोटीस बजावली होती.

अन्न सुरक्षा निरीक्षकांनी बेरीनागपाठोपाठ रुद्रपूर, उधम सिंह नगर आणि उत्तराखंडमधील काही दुकानांमधील पतंजली सोनपापडीचे नमुने गोळा केले. अन्न आणि औषध प्रशासनाच्या प्रयोगशाळांमध्ये या सोनपापडीची तपासणी करण्यात आली. या प्रयोगशाळांनी डिसेंबर २०२० मध्ये राज्याच्या अन्न सुरक्षा विभागाला पतंजलीच्या सोनपापडीची निकृष्ट गुणवत्ता दर्शवणारा अहवाल पाठवला. त्यानंतर व्यावसायिक लीलाधर पाठक, विरतक अजय जोशी आणि **(पान २ वर)**

# रॉबर्टस्गंज मतदारसंघ माजी ब्रिटिश अधिकाऱ्याच्या नावावर

नवी दिल्ली : लोकसभा निवडणुकीच्या दृष्टिकोणातून उत्तर प्रदेश हे अत्यंत महत्त्वाचे राज्य आहे. येथील ८० जागा सरकार स्थापनेत निर्णायक भूमिका बजावतात. येथील अनेक जागांचा इतिहास खूपच रंजक आहे. यापैकी एक जागा माजी ब्रिटिश अधिका-याच्या नावावर आहे. ही लोकसभा जागा रॉबर्टस्गंज आहे, जी राज्यातील सोनभद्र जिल्ह्यात स्थित एक शहर आहे.

मिर्झापूरच्या दक्षिणांचलमधून सोनभद्र जिल्हा तयार करण्यात आला आहे. उत्तर प्रदेशचे




तत्कालीन मुख्यमंत्री नारायणदत्त तिवारी यांनी ४ मार्च १९८९ रोजी सोनभद्र म्हणून नवीन जिल्हा निर्माण करण्याची घोषणा केली होती. यानंतर, रॉबर्टसगंजला नवीन जिल्ह्याचे मुख्यालय बनवण्यात आले. रॉबर्टस्गंज या शहराच्या नावामागच्या इतिहासात असे सांगितले जाते की, ब्रिटिश सरकारने आपल्या सोयीनुसार अनेक शहरांची नावे ठेवली होती. याच क्रमाने १९२८ मध्ये तड का दौर या क्षेत्राचे नाव बदलून रॉबर्टस्गंज करण्यात आले. फ्रेडरिक रॉबर्टस् हे १८८५ ते १८९३ पर्यंत ब्रिटिश भारतीय लष्कराचे कमांडर इन चीफ होते. आर्मी फील्ड मार्शल फ्रेडरिक रॉबर्ट यांच्या नावावरून हे नाव देण्यात आले.

रॉबर्टस्गंज लोकसभा मतदारसंघातून मागील निवडणूक अपना दलच्या पकुरी लाल कोल यांनी जिंकली होती. यावेळी पक्षाने त्यांची सून रिंकी कोल यांना या जागेवरून तिकिट दिले आहे. अपना दल भाजपसोबत युती **(पान २ वर)**

## मुस्लीम समाजाची दिशाभूल : योगी आदित्यनाथ

मालेगाव : निवडणूक प्रचारात काँग्रेसकडून मुस्लिम समाजाला चुकीची माहिती देऊन दिशाभूल केली जात आहे. परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळातील योजना या केवळ हिंदूंसाठी नव्हे, तर मुस्लिम समाजासाठीदेखील आहेत, असे प्रतिपादन उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी केले.

मालेगाव येथील महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयाच्या प्रांगणात धुळे लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार डॉ. सुभाष भामरे यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत ते बोलत होते. यावेळी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, **(पान २ वर)**

# २००४ साली राष्ट्रवादीकडे मुख्यमंत्रिपदासाठी योग्य नेता नव्हता

मुंबई : लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातील मतदान सोमवारी, २० मे रोजी होणार आहे. शरद पवार यांनी मोठे वक्तव्य केले आहे. २००४ साली राज्यात राष्ट्रवादीला सर्वाधिक जागा मिळाल्या होत्या मात्र, त्यावेळेस पक्षात मुख्यमंत्रिपदासाठी योग्य उमेदवार नव्हता असा दावा शरद पवार यांनी केला आहे. यासोबतच त्यावेळी जर छगन भुजबळ यांच्या गळ्यात मुख्यमंत्रिपदाची माळ घातली असती तर पक्ष फुटला असता असा धक्कादायक खुलासाही पवार यांनी केला.

शरद पवार यांनी एका माध्यमसमूहाला दिलेल्या मुलाखतीत आज हा दावा केला. राष्ट्रवादी पक्षाची स्थापना १९९९ मध्ये केली. त्याच्या पाच वर्षांनंतर २००४ मध्ये राष्ट्रवादीला सर्वाधिक जागा मिळाल्या. त्यावेळी आम्हाला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा



मुख्यमंत्री करता आला असता, मात्र त्यावेळी आमच्याकडे त्या तोडीचा नेता नव्हता, असे पवार म्हणाले. २००४ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसला ७१ तर काँग्रेसला ६९ जागा मिळाल्या होत्या. त्यानंतरही काँग्रेसचे वरिष्ठ नेते विलासराव देशमुख यांनाच मुख्यमंत्री बनवण्यात आले होते.

दरम्यान, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हाच मुद्दा पकडून २००४ साली राष्ट्रवादी पक्षातील काही नेत्यांनी अजित पवार यांना मुख्यमंत्री करण्याची मागणी शरद पावरांकडे केली होती. मात्र, शरद पवार यांनी मुख्यमंत्रिपद काँग्रेसला देऊन राष्ट्रवादीसाठी जास्त मंत्रिपद मिळवले . शरद पवारांच्या या निर्णयावर अजित पवार सध्या टीका करताना दिसत असून, शरद पवारांनी त्यावेळी आमच्याकडे योग्य नेता नव्हता असे सांगून अप्रत्यक्षपणे अजित पवारांनाच टोला लगावला आहे.

सुप्रिया-अजितमध्ये कधीही भेद नाही केला

यावेळी बोलताना पवारांनी असेही म्हटले की, **(पान २ वर)**

## आरक्षणाची मर्यादा वाढवणार की नाही?

नवी दिल्ली : लोकसभा निवडणुकीसाठी चार टप्प्यातील मतदान झाले असून सोमवार दि. २० मे रोजी पाचव्या टप्प्यातील मतदान होत आहे. तत्पुर्वी, काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी आरक्षण आणि जातीवर आधारित जनगणनेच्या मुद्यावरून भाजपवर जोरदार टीका केली. तसेच, मनमोहनसिंग सरकारमध्ये २०११ साली झालेल्या जनगणनेबाबत आणि आरक्षणाच्या मर्यादेबाबत भाजपला प्रश्न विचारला.

काँग्रेस नेते जयराम रमेश म्हणाले देशभरातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि मागासवर्गीयांना आरक्षणाचे पूर्ण अधिकार मिळाले पाहिजेत आणि त्यासाठी जातगणना गरजेची आहे. २०११ साली मनमोहन सरकारमध्ये आर्थिक, सामाजिक आणि जातीय जनगणना झाली होती. त्या अहवालात जातीय जनगणनेबाबत जी माहिती मिळाली, ती समोर येऊ शकली नाही, कारण त्याला तीन वर्षे लागली आणि तोपर्यंत मोदींचे सरकार आले होते. मोदींनी ती माहिती समोर येऊ दिली नाही असे जयराम रमेश म्हणाले.

मोदी सरकार सामाजिक, आर्थिक आणि जातीय जनगणनेच्या बाजूने आहे की नाही, याचे त्यांनी अद्याप स्पष्टीकरण दिलेले नाही. १९९२ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने मंडल आयोगाच्या संदर्भात निर्णय दिला होता, ज्यामध्ये एससी, एसटी आणि ओबीसीसाठी ५० टक्के आरक्षणाची मर्यादा असणे आवश्यक असल्याचे सांगितले होते. फक्त तामिळनाडूचा आरक्षण कायदा भारतीय राज्यघटनेच्या ९ व्या अनुसूचीमध्ये समाविष्ट आहे. तामिळनाडूमध्ये ६९ टक्के आरक्षण आहे, परंतु ते असंवैधानिक नाही. आम्ही म्हणतो की आम्ही आरक्षणाची मर्यादा वाढवू. पण, माझा सरकारला सवाल आहे की, तुम्ही आरक्षणाची मर्यादा वाढवणार का? जात जनगणना करणार का? असा सवाल त्यांनी यावेळी केली.

# युपीएससी परीक्षार्थींना दररोज ३००० रुपये देण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे आदेश

नवी दिल्ली : स्पर्धा परीक्षांमध्ये स्वत:ला सिद्ध करण्यासाठी तरुणाईमध्ये मोठी चढाओढ सुरु असते. विद्यार्थी रात्रंदिवस झपाटून अभ्यास करतात. गेल्या काही वर्षातील एमपीएससी आणि युपीएससी स्पर्धेतील गुणवंतांमध्ये ग्रामीण भागातील युवकांनीही दैदिप्यमान यश मिळवले आहे. परंतू गेल्या काही महिन्यांपासून हिंसाचार व जाळपोळीच्या घटनांनी हादरुन गेलेल्या मणिपूरमधील उमेदवारांना दिलासा देणारा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने घेतला आहे. त्यामुळे, युपीएससी परीक्षेसाठी या उमेदवारांचा होणारा खर्चाचा भार हलका होणार आहे.

मणिपूरमधील हिंसाचारग्रस्त जिल्ह्यांतील ज्या उमेदवारांना २६ मे रोजी यूपीएससी परीक्षा देण्यासाठी राज्याबाहेर जावे लागणार आहे, त्यांना मणिपूर सरकारने दरदिवशी तीन हजार रुपये द्यावे, असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. अशा प्रकारचा आदेश या न्यायालयाने देणे ही दुर्मीळ घटना आहे.

सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड व न्या. जे. बी. पारडीवाला, न्या. मनोज मिश्रा यांच्या खंडपीठाने हा आदेश दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे मणिपूरमधील स्थानिका उमेदवारांना दिलासा मिळाला आहे. गेल्या काही महिन्यांपासून येथील तरुणही हिंसाचार व जाळपोळीच्या घटनांनी व्यथीत झाला आहे. तरीही, युपीएससी स्पर्धेतून तो स्वत:ला सिद्ध करत आहे.

मणिपूरच्या डोंगराळ भागातील जिल्ह्यांमधील यूपीएससी परीक्षार्थींनी सुरक्षिततेच्या दृष्टीने अन्य राज्यांत जाऊन ही परीक्षा देण्याचे ठरविले आहे. त्यासंदर्भातील याचिकेची शुक्रवारी संध्याकाळी विशेष सुनावणी झाली. त्यावर, खंडपीठाने आदेश दिला की, मणिपूरमध्ये जे परीक्षार्थी डोंगराळ भागातील जिल्ह्यांत राहातात व ज्यांनी यूपीएससीची नागरी सेवा परीक्षा देण्यासाठी अर्ज केला आहे, त्यांना दरदिवशी तीन हजार रुपये देण्यात यावेत. त्यामुळे हे परीक्षार्थी अन्य राज्यांत प्रवास करून तेथील केंद्रावर जाऊन परीक्षा **(पान २ वर)**

# जलसंधारणाच्या कामांची जिल्हाधिकारी यांच्या कडून पाहणी



अहमदपूर (प्रतिनिधी)- तालुक्यातील जलसंधारणाच्या विविध कामांना भेटी देवून पाहणी करून मा. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे मॅडम यांनी स्थानिक नागरिकांशी संवाद साधला.

या कामांबाबत त्यांच्या प्रतिक्रिया जाणून घेतल्या. अहमदपूर तालुक्यातील मोघा येथील नाल्यावर जलसंधारण महामंडळ निधीतून उभारण्यात आलेल्या कोल्हापुरी पद्धतीच्या बंधाऱ्याचे काम हाती घेण्यात आले असून या कामामुळे ९० सहस्त्र घनमीटर पाणीसाठा निर्माण होणार असून जवळपास २३ हेक्टर क्षेत्राला सिंचनाची सुविधा निर्माण होणार आहे. नुकतेच या बंधाऱ्याचे काम पूर्ण झाले आहे.

विहिरी, विंधन विहिरींच्या पाणी पातळीत वाढ होण्यास या कामामुळे मदत होणार असल्याने शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले. यासोबतच गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार अभियानातून मोघा येथील लघुपाटबंधारे तलावातील गाळ उपसा सुरु असून या तलावातून आतापर्यंत ३९ हजार १०० घनमीटर गाळ उपसा करण्यात आला असून त्यामुळे ३९ लाख लिटर अतिरिक्त पाणीसाठा निर्माण होणार आहे. या तलावातून उपसलेला गाळ आजूबाजूच्या ५ गावातील शेतकऱ्यांनी आपल्या शेतात नेवून टाकला असल्याने तेथील जमीनही सुपीक होण्यास मदत झाली आहे.स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक शेतकरी यांना या कामासाठी शासनाने मदत उपलब्ध करून दिली असून यामुळे गरीब शेतकऱ्यांना आपल्या शेतामध्ये गाळ नेवून टाकणे शक्य झाले आहे. यावेळी मा . जिल्हाधिकारी वर्षा घुगे ठाकूर मॅडम, अहमदपूर तहसीलदार मा.शिवाजीराव पालेपाड साहेब, चाकूर तहसीलदार मा.नरसिंग जाधव साहेब, तलाठी पवार मॅडम, तलाठी खोमणे सर, लघु पाटबंधारे विभागातील अधिकारी,ग्रामसेवक गायकवाड सर, सरपंच जयश्री कदम व मोघा गावातील नागरिक उपस्थित होते.

श्री विठ्ठलसाई सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक चेअरमन

कै. माधवराव बापूराव पाटील (काका)

यांच्या पुण्यस्मरणानिमित्त विनम्र अभिवादन व कोटी- कोटी प्रणम !



कै. माधवराव (काका) बापूराव पाटील

विनम्र अभिवादक

नगरशिक्षणविकासमंडळ, मुरूम.

ता.उमरगा, जि. धाराशिव

श्री विठ्ठलसाई सहकारी साखर कारखाना लि., उमरगा जनता सहकारी बँक लि, उमरगा कृषी उत्पन्न बाजार समिती, मुरूम.

श्रमजिवी शिक्षण प्रसारक मंडळ, उमरगा. उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. धाराशिव

## लोकलच्या गर्दीमुळे झालेला मृत्यू हा अपघातच!

मुंबई १९ - मुंबईची जीवनवाहिनी समजल्या जाणाऱ्या लोकल ट्रेनमध्ये गर्दीमुळे पडून झालेला मृत्यू हा अपघात आहे. या अपघाताची जबाबदारी रेल्वे प्रशासनाची आहे. त्यामुळे अपघातग्रस्तांच्या नातेवाईकांना ४ लाख रुपये भरपाई देण्याचे आदेश देखील मुंबई हायकोर्टाने रेल्वे प्रशासनाला दिले आहेत. तीन महिन्यात भरपाई न दिल्यास १२ टक्के व्याज दराने रक्कम वसूल करण्यात येईल, असा इशारा देखील कोर्टाने दिला आहे.

मुंबईत लोकलच्या गर्दीमुळे अनेक अपघात होता. यात खांबाला धडकून, खाली पडून होणाऱ्या अपघातांची संख्या देखिल वाढली आहे. त्यामुळे कोर्टाने यावर चिंता व्यक्त केली आहे.

आईसोबत नातेवाईकांकडे जाण्यासाठी निघालेल्या २४ वर्षीय तरुणाचा ठाकूर्ली-डोंबिवलीदरम्यान खांबाची धडक बसल्याने मृत्यू झाला होता. शुक्रवारी ही घटना घटली. या घटनेत गंभीर जखमी झालेल्या तरुणावर पाच दिवस रुग्णालयात उपचार सुरू होते.

दुसऱ्या घटनेत उल्हासनगर येथे राहणाऱ्या पद्मनन्ना पिरांन्ना पुजारी (वय ५५) यांचा ट्रेनमधून पडून मृत्यू झाला. पद्मन्ना पुजारी हे मुंबईत कामाला होते.

तिसऱ्या घटनेत दिवा आणि कोपर रेल्वे स्थानकादरम्यान स्थानिक नागरिक रेल्वे रूळ ओलांडण्याचा प्रयत्न करत असताना अज्ञात लोकलने दिलेल्या धडकेत एकाचा मृत्यू झाल्याची घटना रात्री ८.४५ च्या सुमारास घडली.

# ३० हजार पोलीस, ३ दंगल पथके आणि..; महाराष्ट्रातील मतदानाच्या शेवटच्या टप्प्यासाठी अशी सुरु आहे तयारी

मुंबई १९- सध्या संपूर्ण देशभरात लोकसभा निवडणूक पार परत आहे. लोकसभेच्या एकूण ५४३ जागांसाठी सात टप्प्यात निवडणूक प्रक्रिया पार पडत आहे. त्यात महाराष्ट्रातील १३ मतदारसंघात येत्या सोमवारी मतदान पार पडणार आहे. लोकसभा निवडणूक सुरळीत पार पडावी, यासाठी मुंबई पोलिसांकडून कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. मुंबईत उद्या सोमवारी (२० मे) ३० हजारांहून अधिक पोलिसांची फौज तैनात करण्यात येणार आहे. तसेच ३ दंगल नियंत्रण पथकही तैनात केली जाणार आहेत.

लोकसभा निवडणुकीच्या मतदानाच्या पार्श्वभूमीवर मुंबई पोलिसांकडून विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत. उद्या मुंबईत ठिकठिकाणी मोठा कडेकोट बंदोबस्त असणार आहे. मुंबईत २ हजार ७५२ पोलीस अधिकारी, २७ हजार ४६० पोलीस अंमलदार, ६ हजार २०० होमगार्ड, ३ दंगल नियंत्रण पथक (आरसीपी) आणि ३६ केंद्रीय सुरक्षा दल बंदोबस्तासाठी तैनात करण्यात आले आहेत. त्यासोबतच मुंबई पोलिसांकडून १६ मेपासून आतापर्यंत ८ हजार ०८८ नागरिकांवर प्रतिबंधात्मक कारवाईही करण्यात आली आहे.

मोबाईल वापरण्यास बंदी

त्यासोबतच मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात आणि मतदान केंद्रात मोबाईल वापरण्यास बंदी घालण्यात आली आहे. तसेच मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात कोणतीही वायरलेस यंत्रणा नेण्यासही बंद असेल. तसेच मतदान केंद्राच्या परिसरात बॅनर, ध्वनीक्षेपक, मेगोफोनचा वापर करण्यासही बंदी असणार आहे.

याशिवाय मतदान केंद्र परिसरात मतदार आणि निवडणूक आयोगाचे अधिकारी वगळता इतर कोणतीही व्यक्ती घुटमळणार नाही याची काळजी घेण्यात येणार आहे. तसे करताना आढळल्यास त्याच्यावर कारवाई करण्यात येणार आहे. नागरिकांनी या सर्व नियमांचे पालन करुन पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन मुंबई पोलिसांकडून केले जात आहे.

मुंबईतील सहा मतदारसंघात मतदान

दरम्यान येत्या २० मे रोजी मुंबईतील सहा मतदारसंघात मतदान पार पडत आहे. यात उत्तर मुंबई मतदारसंघ, उत्तर-पश्चिम मुंबई मतदारसंघ, उत्तर-पूर्व मुंबई मतदारसंघ, उत्तर-मध्य मुंबई मतदारसंघ, दक्षिण मध्य मुंबई मतदारसंघ, दक्षिण मुंबई मतदारसंघ या सहा मतदारसंघाचा समावेश आहे. मुंबईसोबतच महाराष्ट्रातील धुळे, दिंडोरी, नाशिक, पालघर, भिवंडी, कल्याण, ठाणे या लोकसभा मतदारसंघातही मतदान पार पडणार आहे. यासाठी निवडणूक आयोगाकडून जय्यत तयारीही केली जात आहे.



रोमानियाचे बुखारेस्ट येथे आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्र दिनानिमित्त अ‍ॅस्ट्रोफेस्ट कार्यक्रमादरम्यान एक मुलगा दुर्बिणीतून अंतराळ पाहत आहे.

# दादरच्या मॅकडोनाल्डमध्ये बॉम्बस्फोट होणार

मुंबई १९- बसमधून प्रवास करत असताना दोन लोक दादर येथील मॅकडोनाल्ड उडवण्याबद्दल बोलत असल्याचे ऐकल्याचे नियंत्रण कक्षाला फोन करणाऱ्याने सांगितल्याने पोलिसांची पळापळ सुरु झाली आहे.

रविवारी सकाळी मुंबई पोलीस नियंत्रण कक्षाला एक फोन आला होता, ज्यामध्ये फोन करणाऱ्याने मुंबईतील दादर भागात असलेल्या मॅकडोनाल्डमध्ये बॉम्बस्फोट होणार असल्याची माहिती दिली.

त्याने सांगितले की, तो बसमध्ये प्रवास करत होता तेव्हा त्याने दोन लोक मॅकडोनाल्ड उडवण्याबद्दल बोलत असल्याचे ऐकले.

यानंतर पोलिसांनी सतर्कता दाखवत संपूर्ण तपास केला. मात्र त्यांना कोणतीही संशयास्पद वस्तू आढळून आली नाही. पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत, अशी माहिती मुंबई पोलिसांनी दिली.

दरम्यान मुंबईत २० मे रोजी लोकसभा निवडणुकीसाठी ६ जागांवर मतदान होणार आहे. त्यामुळे पोलिसांनी हे प्रकरण गांभिर्याने घेतले आहे.

दरम्यान, काही दिवसांपूर्वी पुण्यासह सांगली, मिरज, कोल्हापूर आणि सोलापूरातील रेल्वे स्थानके बॉम्बने उडवून देण्याची धमकी सांगली पोलिसांना फोन करून देण्यात आली होती. त्यानंतर आज सांगली पोलिसांनी मुंबई लोहमार्ग पोलिसांच्या मदतीने आरोपीला अटक केली आहे.

# महापालिका सफाई कर्मचारी सुनील कुंभार यांनी सापडलेले १५ तोळे सोने दिले पोलिसांकडे!

मुंबई,१९ - बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनातील कर्तव्यक्षमता, सचोटीची उदाहरणे अनेक अधिकारी, कर्मचारी, कामगारांच्या माध्यमातून नेहमीच जनतेसमोर येतात. कर्तव्यदक्षता आणि प्रामाणिकपणाचे असेच एक उदाहरण डी विभागातील स्वच्छता कर्मचारी सुनील कुंभार यांच्या रुपाने समोर आले आहे. महर्षी कर्वे रस्त्यावर, केनेडी पुलाजवळ रस्ता साफ करीत असताना आढळलेले अंदाजे १५ तोळे सोने पोलिसांकडे सुपूर्द करून त्यांनी प्रामाणिकपणा दाखविला. पालिका कर्मचाऱ्याचा हा प्रामाणिकपणा पाहून मुंबईचे महापालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी कुंभार यांचा सत्कार केला आणि सफाई कामगारांच्या जीवनावर आधारीत असलेल्या नाटकाची दोन तिकिटेही भेट दिली.



भल्या पहाटेपासून मुंबईचा कोपरान् कोपरा स्वच्छ करणारे स्वच्छता कर्मचारी दररोज आपल्या नजरेस पडतात. न थांबता, न थकता हे कर्मचारी मुंबई स्वच्छ ठेवण्यासाठी घाम गाळतात. पालिकेच्या डी विभागामध्ये घनकचरा व्यवस्थापन खात्यांतर्गत कार्यरत सुनील कुंभार रविवारी, १२ मे २०२४ रोजी महर्षी कर्वे रस्त्यावर, केनेडी पुलाजवळ स्वच्छता करीत असताना अंदाजे १५ तोळे सोने (एक सोन्याचे बिस्कीट दहा तोळे), एक सोन्याची वळी पाच तोळे) आढळून आले. त्यासोबत मूळ मालकाचा कोणताही पुरावा नसल्याचे पाहून कुंभार यांनी मुकादम बाळाराम जाधव यांच्याकडे हे सोने सुपूर्द केले. त्यानंतर, त्यांनी नजीकच्या दादासाहेब भडकमकर मार्ग पोलीस ठाण्यात जाऊन अज्ञात व्यक्तीच्या मालकीचे १५ तोळे सोने सापडल्याची माहिती दिली. प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करुन हे सोने त्यांनी पोलीस शिपाई दीपक डावरे यांच्या ताब्यात दिले.

पालिका आयुक्त गगराणी यांना ही माहिती मिळताच त्यांनी सुनील कुंभार आणि मुकादम बाळाराम जाधव यांच्या प्रामाणिकपणाचे कौतुक तर केलेच, यासोबतच स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या जीवनावर आधारित अस्तित्त्व, या नाटकाची तिकिटे भेट दिली. तसेच संपूर्ण कुटुंबासह नाटकाला आवर्जून जा, असेही सांगितले. आयुक्त गगराणी यांनी कौतुकाने पाठ थोपटल्याने कुंभार आणि जाधव यांच्या चेहऱ्यावर आनंद पसरला. गगराणी यांनी आपल्या दालनात त्यांना पुष्पगुच्छ आणि शाल श्रीफळ प्रदान करून कौतुक केले. यावेळी अतिरिक्त पालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) डॉ. सुधाकर शिंदे, सहायक आयुक्त (डी विभाग) शरद उघडे आदी उपस्थित होते.

# तीन हजार रुपयांची लाच घेण्याची तयारी दर्शवणारा तलाठी गजाआड

धाराशिव दि.१९ (प्रतिनिधी) - एका शेतकऱ्याच्या जमिनीची नोटीस काढून फेरफारला नोंद घेण्यासाठी स्त:सह साहेबांना देण्यासाठी चार हजार रुपयांच्या लाचेची मागणी एका तलाठ्याने केली. मात्र लाच देण्याची इच्छा नसल्यामुळे संबंधित तक्रारदाराने थेट लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून आपली हकीकत सांगितली. त्यामुळे लाचलुचपत विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्या तलाठ्या विरोधात लाचलुचपत प्रतिबंधक कायद्या अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, कळंब तालुक्यातील आंदोरा सज्जाचे व ईटकुर येथील अतिरिक्त कार्यभार सांभाळणारे वर्ग ३ म्हणून कार्यरत असलेले तलाठी कल्याण शामराव राठोड, (वय- ४३ वर्षे) रा. ज्ञानेश्र्वर नगर, राजीव गांधी चौक, आयटीआय कॉलेजच्या पाठीमागे, बीड यांच्याकडे एका २५ वर्षीय तक्रारदार असलेल्या पुरुषाने दि.१४ मे रोजी त्यांच्या भावाच्या नावे खरेदी घेतलेल्या शेत जमिनीची नोटीस काढून फेरफारला नोंद घेण्यासाठी स्वतःसाठी व साहेबाला द्यावे लागतील असे म्हणून तलाठी कल्याण राठोड यांनी तक्रारदाराकडे ४ हजार रुपयांच्या लाच रकमेची मागणी केली. मात्र तडजोडी अंती ३ हजार रुपये लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली. याची खात्री लाचलुचपत विभागाच्या अधिकाऱ्यांनी केली. त्यामुळे या प्रकरणी कळंब पोलीस ठाण्यात लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही यशस्वी कामगिरी छत्रपती संभाजीनगर येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस अधीक्षक (मो.न. ९९२३० २३३६१), मुकुंद आघाव (मो.नं. ९८८१४ ६०१०३) यांच्या मार्गदर्शनाखाली धाराशिव येथील पोलीस उप अधीक्षक व सापळा अधिकारी सिध्दाराम म्हेत्रे (मो.नं. ९५९४६ ५८६८६) यांनी सापळा रचून केली. या पथकामध्ये पोलीस अमलदार स.फौ. इफ्तेकार शेख, दिनकर उगलमुगले, विष्णु बेळे, सचिन शेवाळे, नागेश शेरकर यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे लोकसेवक अथवा त्यांच्यावतीने कोणी खाजगी व्यक्ती कायदेशीर काम करून देण्यासाठी लाचेची मागणी करीत असेल तर कार्यालय ०२४७२ - २२२८७९ व टोल फ्री क्रमांक १०६४ या नंबरवर संपर्क साधावा असे आवाहन म्हेत्रे यांनी केले आहे.

### एअर इंडिया एक्स्प्रेसच्या विमानाला लागली आग

नवी दिल्ली : एअर इंडिया एक्स्प्रेसच्या विमानाने शनिवारी रात्री उड्डाण केल्यानंतर लगेचच एका इंजिनला आग लागल्याने बंगळुरू विमानतळावर आपत्कालीन लँडिंग करण्यात आले. यामुळे १८५ प्रवाशांचे प्राण वाचले आणि सर्व प्रवाशांना विमानातून सुखरूप खाली उतरवण्यात आले. विमान बंगळुरूहून कोचीला जात होते. सूत्रांनी सांगितले की, विमानाने उड्डाण केल्यानंतर लगेचच क्रू मेंबर्सनी एटीसीला इंजिनला आग लागल्याची माहिती दिली. एअर इंडिया एक्स्प्रेसच्या प्रवक्त-याने सांगितले की, बंगळुरू-कोची विमानाने उड्डाण करताच उजव्या इंजिनला आग लागल्याचे निदर्शनात आले. यानंतर विमान परत उतरवण्याचा निर्णय घेण्यात आला आणि शनिवारी रात्री विमान बंगळुरू विमानतळावर सुरक्षितपणे उतरवण्यात आले आणि सर्व प्रवाशांना सुखरूप विमानातून बाहेर उतरवण्यात आले.

# लोकसभा निवडणुकीत देशात सर्वाधिक दारु, पैसा, ड्रग्ज जप्तीमध्ये गुजरात पहिल्या नंबरवर

नवी दिल्ली १९- लोकसभा निवडणुकीच्या तारखांची घोषणा झाल्यापासून दोन महिन्यांत विविध यंत्रणांनी देशभरातून रोख रक्कम, दारु, ड्रग्ज, मौल्यवान वस्तू मोठ्या प्रमाणात जप्त केल्या आहेत. जप्त करण्यात आलेली रक्कम २०१९ च्या लोकसभा निवडणूक काळात झालेल्या एकूण जप्तीच्या अडीच पट जास्त आहे. पुढील दोन आठवड्यात मतदानाच्या आणखी तीन फेऱ्या होणार असल्याने या सार्वत्रिक निवडणुकीत एकूण जप्तीची संख्या वाढण्याची शक्यता आहे.

किती वस्तू जप्त केल्या?

निवडणूक आयोगाने शनिवारी जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, एकूण ८,८८९ कोटी रुपयांच्या जप्तीपैकी ड्रग्ज आणि अंमली पदार्थांचा वाटा सुमारे ४५ टक्के त्यानंतर मफ्रीबीजफ २३ टक्के आणि मौल्यवान वस्तू १४ टक्के आहेत. एजन्सींनी ८४९ कोटी रुपयांची रोकड आणि ८१५ कोटी रुपयांची सुमारे ५.४ कोटी लिटर दारूही जप्त केली आहे. सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये, गुजरात एटीएस, नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो आणि इंडियन कोस्ट गार्ड यांनी केलेल्या नुकत्याच केलेल्या संयुक्त ऑपरेशनमुळे सुमारे १,४६२ कोटी रुपयांची जप्ती गुजरातमध्ये होती. या यादीत राजस्थान दुसऱ्या क्रमांकावर असून अंमलबजावणी एजन्सींनी सुमारे ७५७ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त केली आहे.

या निवडणुकांमध्ये अमली पदार्थावरही कारवाई करण्यात आल्याचे निवडणूक आयोगाने सांगितले. गुजरातशिवाय महाराष्ट्र आणि दिल्लीतही अमली पदार्थ जप्त करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. १७ एप्रिल रोजी पोलिसांनी ग्रेटर नोएडा येथे एका ड्रग फॅक्टरीचा पर्दाफाश केला होता. तेथून १५० कोटी रुपयांचे २६.७ किलो एमडीएमए जप्त करण्यात आले होते आणि दोन परदेशी लोकांना अटक करण्यात आली होती.

निवडणूक आयोगाने निदर्शनास आणून दिले की इतर क्लस्टरमधील जप्ती तितक्याच प्रभावशाली आहेत आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकीतील एकूण जप्तीही मोठ्या फरकाने मागे टाकल्या आहेत. ड्रग्ज आणि सायकोट्रॉपिक पदार्थासह प्रलोभनांविरूद्ध वाढीव सतर्कतेमुळे मोठ्या प्रमाणात जप्ती क्रॅकडाउन आणि सतत वाढ झाली आहे. ड्रग्ज जप्ती सर्वाधिक झाल्याचे निवडणूक आयोगाने सांगितले. निवडणूक आयोगाच्या म्हणण्यानुसार, डेटाच्या विषणातून असे दिसून आले आहे की जे राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश ट्रान्झिट झोन होते ते आता झपाट्याने मउपभोग क्षेत्रफ बनत आहेत.

दारू जप्तीच्या बाबतीत हे राज्य पहिल्या क्रमांकावर

दारूच्या बेकायदेशीर वाहतुकीच्या बाबतीत, सुमारे १.५ कोटी लिटर दारू जप्त करून कर्नाटक पहिल्या क्रमांकावर आहे, त्यानंतर महाराष्ट्राचा क्रमांक लागतो. येथून सुमारे ६२ लाख लिटर दारू जप्त करण्यात आली. ११४ कोटी रुपयांची रोकड जप्त करण्यात तेलंगणा राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये आघाडीवर आहे.

पान ८ वरून

### श्रीगुरु हावगीस्वामी

आंबेजोगाई, देशिकेंद्र महाराज शिवाचार्य ची कलशधारी सुवासीनु महिला, विविध गावचे महिला भजनी मंडळ टिळमृदगाच्यागजरात गूरुराज माऊलीचा गजर करत पाऊले खेळत सहभागी झाले होते . तर तरुणाई महात्माबसवेश्र्वराच्या गीतावर नाचण्यात तल्लीन झाली होती. या मिरवणूकित माजी जि.प.अध्यक्ष राहुल केंद्रे, बाजार समितीचे माजी सभापती सिध्देश्र्वर पाटिल, विजयकुमार निटुरे, शि.भ.प.शिवराज नावंदे, अॅड दत्ता पाटील, सुमित बागबंदे,सुभाष धनूरे,दत्ता खंकरे,मनोज पुदाले,बाबुराव पांढरे,हावगी पन्नासे,बालाजी गवारे,ईश्र्वर समगे,हावगीस्वामी युवक मंडळाचे सगंम समगे,डॉ.रवी मुळे,माधव समगे,पिंट्टु समगे, आकाश समगे, मोहित आष्टुरे,महेश समगे,आदित्य समगे,सोमनाथ मुळे,योगेश समगे, कल्याण कपाळी,रोहित स्वामी,नसप्पा खंदारे,नागेश आठाणे,हावगीप्रसाद स्वामी,सुरेश आठाणे,रामेश्र्वर खंदारे,अभिषेक समगे,सुमित आष्टुरे ,सुनिल उप्परबावडे,शेखर कानमंदे, मनोज उप्परबावडे,रतिष उप्परबावडे, सतिष उप्परबावडे,,संदिप उप्परबावडे,सोपनिल खंदारे, रमेश अंजुरे, प्रशांत स्वामी,औम उप्परबावडे.श्रीगुरु हावगीस्वामी महिला मंडळाचे श्रीमती लक्ष्मिबाई पांढरे, माजी नगरसेविका श्रीमती रेखाताई कानमंदे,शंकुंतला समगे, श्रीदेवी खंदारे,सुनिता मठपती,ज्योती समगे, प्रेमला समगे, ताराबाई मोदी,सविता समगे,सुरेखा समगे,कलावती आठाणे, कल्पना कानमंदे, सुरेखा मोदे,प्रेमला खंदारे,शिवमाला समगे, जगदेवी स्वामी, रेष्मा कापसे, कस्तुरा समगे,सुभद्रा कुंभार,शरणम्मा डाबरगिते, चंद्रकला करंजे, सुनंदा हळ्ळे, पुष्पा द्याडे, छबू द्याडे, अनिता नुत्ते, सुशिला हुडगे, सुनिता डोणगाव, लक्ष्मिबाई स्वामी , महादेवी गौरशेट्टे,विद्यावती कानमंदे, चन्नमा बिरादार, राजेश्री उप्परबावडे,रेवम्मा उप्परबावडे, बालिका कानमंदे,शोभा चपाते, संगीता गौरशेट्टे,रेखा पटणे,मिना कानमंदे ,औंकारेश्र्वर भजनी मंडळ, शिवशक्ती भजनी मंडळ, नवशा महादेव भजनी मंडळ,सिध्दरामेश्र्वर भजनी मंडळ, शिवलिंग पाटिल कदुकिनीकर,प्रवचनकिर,कर्तिनकार आदी सह महिला पुरुष अबिलवृध्द शिवभक्त सहभागी झाले होते.विविध ठिकाणी भक्तांनी जगदगुरु व शिवाचार्यांचे स्वागत केले .शंकरलिंग मठाचे वतीने सुखदेव महाराज यांनी जगदगुरुंचे स्वागत केले,पत्तेवार चौक येथे श्रीमती विमल गर्गे परिवाराच्यावतीने तर सुरेश राजपाल व राजपाल परिवाराच्यावतीने स्वागत करण्यात आले. भारतीय जनता पार्टीच्यावतीने शंकरलिंग मठासमोर जलपानाची व्यवस्था केली होती.

ही मिरवणूक श्री हावगीस्वामी शेतमळा बिदर रोड येथून निघून शाहु महाराज चौक,छत्रपती शिवाजी महाराज चौक,पोलिस स्टेशन,पत्तेवार ,अशोकदादा पुदाले चौक, वीरशैव समाज,आर्यसमाज, चौबारा मार्गे श्री गुरु हावगीस्वामी मंदिर येथे मिरवणूकीचा समारोप झाला.मिरवणूक सुरळीत पार पाडण्यासाठी उदगीर शहर पोलिस स्टेशनचे पोलिस निरिक्षक करण सोनवणे ग्रामिणचे पोलिस निरीक्षक अरविंद पवार यांनी चोख व्यवस्था ठेवली होती.

# आरटीई अंतर्गत शाळा प्रवेशाची प्रक्रिया मुंबईत सुरू

मुंबई : शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ साठी शिक्षण हक्क अधिनियम अर्थात आरटीई अंतर्गत २५ टक्के आरक्षित जागांसाठीच्या सुधारित ऑनलाईन प्रवेशप्रक्रियेस मुंबईत शुक्रवार, १७ मेपासून सुरूवात झाली आहे. ऑनलाईन प्रवेशाची अंतिम मुदत शुक्रवार, ३१ मे २०२४ पर्यंत असणार आहे. तत्पूर्वी पालकांनी आपल्या पाल्याच्या प्रवेशासाठी अर्ज करावेत, असे आवाहन बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

यापूर्वी ऑनलाईन पद्धतीने अर्ज केला असला तरी त्याचा या प्रवेशप्रक्रियेत विचार केला जाणार नाही. पालकांनी नव्याने अर्ज करणे बंधनकारक आहे, असेदेखील शिक्षण विभागाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

आरटीईअंतर्गत दुर्बल, वंचित, शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागासवर्ग घटकांकरिता विद्यार्थ्यांच्या घरापासून १ किलोमीटर अंतरावरील खासगी शाळेत २५ टक्के आरक्षित कोट्यातून विनामूल्य प्रवेश दिले जातात. त्यानुसार, मुंबईतील ३१९ पात्र शाळांमधील आरटीईच्या २५ टक्के मोफत प्रवेशासाठी ५,६७० जागा उपलब्ध आहेत. या प्रवेशासाठी पालकांना महाराष्ट्र शासनाच्या https://student.maharashtra.gov.in/admšportal (www Zmhr) या संकेतस्थळावरून ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरता येतील.

यापूर्वी सन २०२४-२०२५ या वर्षाकरिता आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रियेसाठी बालकांच्या पालकांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले होते. तथापि, उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, ही प्रक्रिया स्थगित करण्यात आली. त्यामुळे यापूर्वी ऑनलाईन पद्धतीने अर्ज केला असला तरी बालकांच्या पालकांनी नव्याने प्रवेशअर्ज करणे बंधनकारक आहे. यापूर्वी ऑनलाईन पद्धतीने केलेल्या अर्जाचा सन २०२४-२५ या वर्षाच्या सुधारित आरटीई प्रवेशप्रक्रियेसाठी विचार केला जाणार नसल्याचे पालिकेच्या शिक्षण विभागाच्या वतीने स्पष्ट करण्यात येत आहे.

पान १ वरून

### काँग्रेस...

चिंता नाही. त्यांचे नेते असे उघडपणे सांगतात. ते त्यांच्या भ्रष्टाचार आणि खंडणीशी संबंधित आहेत. काँग्रेसचे राजपुत्र उद्योग, उद्योगपती आणि गुंतवणुकीला रोज विरोध करतात. असे असताना येत्या काळात कोणता उद्योगपती त्यांच्या राज्यात जाऊन भांडवल गुंतवणार आहे? त्या राज्यातील तरुणांचे काय होणार? असा सवालही मोदींनी केला.

### पतंजलीच्या...

पतंजलीचे सहाय्यक व्यवस्थापक अभिषेक कुमार यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले.

सुनावणीनंतर न्यायदंडाधिका-यांनी या तिघांना अन्न सुरक्षा आणि मानक कायदा २००६ च्या कलम ५९ अन्वये सहा महिने तुरुंगवासाची शिक्षा ठोठावली आहे. तसेच या तिघांना अनुक्रमे, ५,००० रुपये, १०,००० रुपये आणि २५,००० रुपयांचा दंड ठोठावला आहे. ही कारवाई करताना न्यायालयाने म्हटले आहे की, आमच्यासमोर सादर केलेले पुरावे हे पतंजलीच्या उत्पादनाचा दर्जा निकृष्ट असल्याचे स्पष्ट निर्देश करतात. त्यामुळे अन्न सुरक्षा अधिका-यांनी दिलेल्या अहवालाच्या आधारे या तिन्ही व्यक्तिंविरोधात दंडात्मक कारवाई केली जात आहे.

दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने पतंजलीच्या फसव्या जाहिरांतीप्रकरणी दोन आठवड्यांपूर्वी झालेल्या सुनावणीवेळी उत्तराखंड परवाना प्राधिकरणाला (उत्तराखंड लायसन्सिंग अथॉरिटी) फटकारले होते. न्यायालयाने पंतजलीच्या फसव्या जाहिरांतीप्रकरणी प्राधिकरणाच्या निष्क्रियतेवर अनेक प्रश्न उपस्थित केले होते. तसेच न्यायमूर्ती म्हणाले, तुमची झोप आत्ता पूर्ण झालीय वाटतं, नुकतेच झोपेतून जागे झालात असं दिसतंय. या सुनावणीवेळी महाधिवक्ते मुकुल रोहतगी यांनी बाबा रामदेव आणि बाळकृष्ण यांची बाजू मांडली. रोहतगी म्हणाले, आम्ही वर्तमानपत्रांमध्ये माफीनामा छापला होता. तो माफीनामा न्यायालयाने आपल्याकडे जमा केला आहे. यासह रोहतगी यांनी पतंजलीचा माफीनामा न्यायमूर्तींसमोरही सादर केला. न्यायालयाने मुकूल रोहतगी यांना प्रश्न विचारला की, तुम्ही मूळ नोंदी का सादर केल्या नाहीत. न्यायालयाने तुमच्याकडे मागितलेली माहिती ई-फायलिंग स्वरुपात सादर करण्यात आली आहे जी खूप गोंधळ निर्माण करणारी आहे. तुमचा हा सगळा गोंधळ पाहून आम्ही आता हात वर केले आहेत. आम्ही मूळ प्रती मागितल्या होत्या, त्या कुठे आहेत, त्या कधी सादर करणार? मूळ प्रती तातडीने सादर करा, असे निर्देशही दिले आहेत.

### रॉबर्टस्गंज...

करून निवडणूक लढवत आहे. भारताच्या आघाडीत सपाने छोटेलाल खरवार यांना येथून उमेदवारी दिली आहे. या जागेसाठी शेवटच्या टप्प्यात १ जून रोजी मतदान होणार आहे.

### मुस्लीम...

उमेदवार डॉ. सुभाष भामरे, खासदार डॉ. अजित गोपछडे, अनिल बोंडे, पालकमंत्री दादा भुसे उपस्थित होते.

भारतात राहून पाकिस्तानचे झेंडे फडकवणा-यांना पाकिस्तानात पाठवा, मग त्यांना तेथील खरी परिस्थिती समजेल, असेही त्यांनी सुनावले. मोदी सरकारच्या काळातच राम मंदिराचा प्रश्न मार्गी लागल्याचेही त्यांनी आवर्जून सांगितले

### २००४ साली...

एकनाथ शिंदे यांना २०१९ साली मुख्यमंत्री करण्यास आमचा विरोध नव्हता, मात्र त्यांचे नावच आमच्या समोर आले नाही. तर प्रफुल्ल पटेल हे २००४ पासूनच भाजपसोबत जाण्यासाठी उत्सुक होते, असेही पवार म्हणाले. यासोबतच मी सुप्रिया सुळे आणि अजित पवार यांच्यात कधीही भेदभाव केला नाही. मी सर्वांनाच पक्षात काम करण्याची संधी दिली. यामुळे पक्षात काम करणा-यांना संधी मिळाली नाही, असे अजित पवार म्हणतात ते चुकीचे आहे, असेही शरद पवारांनी मुलाखतीदरम्यान सांगितले.

### युपीएससी...

देऊ शकतील. त्यामुळे अशा परीक्षार्थींनी संबंधित अधिका-यांशी संपर्क साधावा, असे आवाहनही करण्यात येत आहे.

मणिपूरच्या डोंगराळ भागातील जिल्ह्यांतल्या यूपीएससी नागरी सेवा परीक्षेला इम्फाळ केंद्रातून बसणा-या उमेदवारांना त्यांची केंद्रे बदलण्याची परवानगी देण्यात येणार असल्याची माहिती यूपीएससीने दिल्ली उच्च न्यायालयाला गेल्या २९ मार्च रोजीच दिली होती.

मणिपूरच्या डोंगराळ जिल्ह्यांतील यूपीएससी परीक्षेचे उमेदवार मिझोराम, कोहिमा, नागालैंड, शिलाँग, मेघालय, दिसपूर, आसाम, जोरहाट, कोलकाता, प. बंगाल, दिल्लीपैकी कोणतेही केंद्र निवडू शकतात, असेही यूपीएससीने म्हटले होते.

# संपादकीय

## तहानलेला मराठवाडा

यंदा मान्सूनचे भवितव्य चांगले असल्याचा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला असला तरी राज्यात मान्सूनचे आगमन होण्यासाठी आणखी दीड-दोन महिन्यांचा कालावधी लागणार आहे.

सध्या राज्यात अवकाळी पावसाचा धुमाकूळ सुरू असला तरी मराठवाड्यात तीव्र पाणीटंचाईने लोक हैराण झाले आहेत. दिवसेंदिवस पाणीटंचाईचे संकट गंभीर होत असून, टँकरने पाणीपुरवठा होणाऱ्या गावांच्या संख्येतही भर पडत आहे. सध्या राजकीय पक्षांचे नेते निवडणुकीच्या प्रचारातच दंग असल्याने पाणीटंचाईच्या गंभीर संकटाकडे प्रशासनाचेही दुर्लक्षच होत आहे. मराठवाड्यातील ७५० लघु पाटबंधारे प्रकल्पातील पाण्याची पातळी केवळ दहा टक्के राहिली असल्याची माहिती पाटबंधारे विभागाने अलीकडेच प्रसिद्ध केली. छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, हिंगोली, धाराशिव, लातूर आणि परभणी जिल्ह्यात पाणीटंचाईचे संकट उद्भवले असल्याचे या अहवालात म्हटले आहे. धरणातील सर्वांत कमी पाणीसाठा जालना जिल्ह्यात आहे. जिल्ह्यातील ५६ जल प्रकल्पांमध्ये केवळ २.४० टीएमसी म्हणजे एकूण साठवण क्षमतेच्या १.४२ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. भूजल पातळीमध्येही घट होत आहे.

त्यामुळे पन्नासपेक्षा अधिक तालुक्यांना पाणीटंचाईला तोंड द्यावे लागत आहे. पाणीटंचाईवरचा उपाय म्हणून टँकरने पाणीपुरवठा केला जात असून, सध्या हजारपेक्षा अधिक टँकर सुरू आहेत. त्यात आणखी वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यातच कडक उन्हाळ्यामुळे पाणीटंचाईचे संकट अधिक गडद होत आहे. टँकरमुक्त महाराष्ट्र ही केवळ घोषणाच राहिली आहे. सर्वांत मोठे जायकवाडी धरण ज्या पैठण तालुक्यात आहे, त्याच पैठण तालुक्यात सर्वाधिक टँकर असल्याचे पाहायला मिळते. काही गावात आठ दिवसांनंतर टँकर येतात. प्रत्येक घरासमोर रिकामी पाण्याची पिंपे पाहायला मिळतात. सध्या सुरू असलेल्या वळवाच्या पावसाने शेतीच्या पाण्याचा प्रश्न काहीसा सौम्य झाला आहे. उजनी धरणाची पाणीपातळी उणे पन्नास टक्के इतकी खालावल्याने उजनीच्या धरणाखाली दडलेल्या अनेक पुरातन वास्तु आणि पुरातन मंदिरे उघड होऊ लागली आहेत. भीमा नदीच्या पात्रात जलसमाधी मिळालेले अतिप्राचीन हेमाड पंथी मंदिर आता पूर्णपणे उघडे पडले आहे, इतकी पाणी पातळी खालावली आहे.

### पाणीटंचाईवर उपाययोजना

राज्य सरकारने काही तालुक्यातील दुष्काळ सदृश परिस्थितीचा विचार करून उपाययोजना राबविण्यास सुरुवात केली आहे; मात्र पिण्यासाठी आणि जनावरांसाठी पाणी आणि चारा यांचे नियोजन करण्याचे मोठे आव्हान प्रशासनासमोर उभे आहे. सध्या निवडणुका असल्याने आचारसंहितेची अडचण येणार नाही, या दृष्टीनेही विचार होण्याची गरज आहे. जवळजवळ प्रत्येक वर्षी कुठे ना कुठे उद्भवणाऱ्या पाणीटंचाईच्या संकटावर मात करण्यासाठी शाश्वत आणि नियोजनपूर्वक जलव्यवस्थापनाचा अवलंब करावा लागणार आहे. त्या दृष्टीने जलसंधारणाला महत्त्व देणे आणि पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करणे आवश्यक आहे. धरणे आणि जलाशयातील पाणी साठे वाढवण्याची आणि वाया जाणारे पाणी अडवण्याची गरज आहे. जलसंधारण, पाण्याचा पुनर्वापर यांसारख्या बाबी त्या दृष्टीने महत्त्वाच्या ठरणार आहेत.

शहरी भागात होणारा पाण्याचा अपव्यय टाळण्याची गरज आहे. मोटारी धुण्यासाठी होणारा पाण्याचा अतिरिक्त वापर टाळता येणे शक्य आहे. यापुढील काळात पाणीटंचाईवरून होणारे संघर्ष अधिक गंभीर होतील अशी शक्यता व्यक्त होते. त्या दृष्टीने पाण्याचे वाटप आणि त्याचे नियोजन योग्य रीतीने होण्याची आवश्यकता आहे. एकीकडे पाणीटंचाई असताना बाटलीबंद पाणी आणि मद्यनिर्मितीचे कारखाने यांना मात्र पाणीटंचाई कशी जाणवत नाही, याचाही शोध घेण्याची गरज आहे. शहरी भागातील पाण्याचा काळजीपूर्वक वापर होण्यासाठी दिवसाआड किंवा दोन दिवसानंतर पाणीपुरवठा यांसारखे उपाय अजमावून पाहायला हरकत नाही. त्यातून पाण्याचा अतिवापर टाळला जाऊ शकतो. गळतीमुळे होणारी पाण्याची नासाडी, घरगुती कामासाठी पाण्याचा अतिरिक्त वापर टाळला तरी पाण्याचे संकट काही प्रमाणात सौम्य होऊ शकेल.

# मुंबईवर वर्चस्व कोणाचे ?




अठराव्या लोकसभा निवडणुकीसाठी सोमवारी, २० मे रोजी देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईतील सहा मतदारसंघांत मतदान होणार आहे. तब्बल ९६ लाख ५४ हजार मतदार आपला मतदानाचा हक्क बजवतील. गेली अनेक वर्षे अविभाजित शिवसेना व भाजपा युतीने महामुंबईत लोकसभा व विधानसभा निवडणुका लढवल्या. सन २०१९ च्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीतही शिवसेना-भाजपा युती कायम होती. पाच वर्षांपूर्वी मुंबईकरांनी सर्वच्या सर्व युतीचे सहा खासदार लोकसभेवर निवडून पाठवले व नरेंद्र मोदींच्या नेतृत्वावर विश्वास दाखवला.

मावळत्या लोकसभेत मुंबईत शिवसेनेचे तीन व भाजपाचे तीन खासदार होते. यंदा २०२४ च्या निवडणुकीत सर्वच राजकीय समीकरणे बदलली आहेत. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने भाजपाशी काडीमोड घेऊन काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसशी घरोबा केला आहे, तर भाजपा एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना व अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसला बरोबर घेऊन निवडणूक लढवत आहे.

गेल्या दोन वर्षांत महाराष्ट्रातील शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस हे दोन प्रमुख राजकीय पक्ष दुभंगले. दोन्ही पक्षांत आमदार-खासदार-पदाधिकाऱ्यांनी मोठा उठाव केला. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने उद्धव ठाकरे यांचे नेतृत्व झुगारून दिले, तर अजित पवारांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसने शरद पवारांचे नेतृत्व नाकारले. दोन वर्षांत महाराष्ट्रात दोन मोठे राजकीय भूकंप झाले, त्यानंतर होणारी लोकसभा निवडणूक ही महायुती व महाआघाडीच्या दृष्टीने मोठी परीक्षा आहे. एकेकाळी मुंबईतून काँग्रेसचे पाच-पाच खासदार लोकसभेवर निवडून जात होते, आता एखादा खासदार निवडून जाणेही त्या पक्षाला कठीण जात आहे. ठाकरेंची शिवसेना व भाजपा यांच्यात काडीमोड झाल्यापासून गेल्या साडेचार वर्षांत हे दोन्ही पक्ष एकमेकांचे कट्टर वैरी झाले आहेत. लोकसभा निवडणुकीनंतर ठाकरेंची शिवसेना शिल्लक राहणार नाही, असे भाजपाचे नेते ठामपणे सांगत आहेत, तर याद राखा, मोदी मला संपवू शकत नाहीत, आपली शिवसेनाच तुम्हाला इंगा दाखवेल, अशी भाषा उद्धव ठाकरे यांनी वापरली आहे. म्हणूनच मुंबई कोणाची? या प्रश्नावर ९६ लाख मुंबईकर २० मे रोजी ईव्हीएमचे बटण दाबून आपला कौल देणार आहेत.मुंबईत राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद नाही. शरद पवारांनी सोनिया गांधींना विदेशी जन्माच्या मुद्द्यावरून विरोध करून १९९९ मध्ये त्यांच्याशी पंगा घेतला. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसची मुंबईतच स्थापना झाली. पक्षाला पंचवीस वर्षे उलटली, पण मुंबई महानगरात पाळेमुळे रुजवता आली नाहीत. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या लढाऊ व आक्रमक नेतृत्वाला मुंबईतील मराठी लोकांनी ते हयात असताना नेहमीच मनापासून साथ दिली. मराठी अस्मितेच्या मुद्द्यावर मुंबईकरांनी शिवसेनाप्रमुखांना नेहमीच प्रतिसाद दिला. मराठी माणूस मुंबईत ताठमानाने उभा राहिला तो शिवसेना प्रमुखांमुळेच, हे त्यांचे राजकीय शत्रूही मान्य करतात. शिवसेनाप्रमुखांच्या हयातीनंतर पक्षाची सर्व सूत्रे उद्धव ठाकरेंकडे आली. पक्षात तेच सर्व शक्तिमान बनले. शिवसैनिकाला मुख्यमंत्री करणार असे त्यांनी शिवसेनाप्रमुखांना वचन दिले होते. प्रत्यक्षात संधी मिळताच ते स्वत:च मुख्यमंत्री झाले. तिथूनच पक्षात खदखद सुरू झाली.

यंदाची लोकसभा निवडणूक भाजपाच्या दृष्टीने नरेंद्र मोदींची पंतप्रधानपदाची हॅटट्रीक व्हावी आणि अब की बार ४०० पार हा संकल्प साकार व्हावा यासाठी जशी प्रतिष्ठेची आहे तसेच मुंबई महानगरात जनाधार कोणाच्या पाठीशी आहे? ठाकरेंची शिवसेना की एकनाथ शिंदेंची शिवसेना? हे या निवडणुकीत स्पष्ट होणार आहे. एकनाथ शिंदे यांना भाजपाच्या आशीर्वादाने राज्याचे मुख्यमंत्रीपद मिळाले, निवडणूक आयोगाने त्यांना पक्षाचे नाव व धनुष्यबाण हे चिन्ह दिले. त्याचा लाभ ते किती उठवू शकतात, हे निकालानंतर उघड होणार आहे.शिवसेना हे नाव व धनुष्यबाण हे चिन्ह मिळाल्यावर एकनाथ शिंदे यांचा पक्ष राज्यात निवडणुकीला प्रथमच सामोरे जात आहे. ठाकरे सरकार कोसळल्यावर मुंबईत अंधेरी, पूर्व येथे विधानसभेची पोटनिवडणूक झाली. त्या निवडणुकीत ठाकरे गटाच्या ऋतुजा रमेश लटके निवडून आल्या, ती निवडणूक शिंदे गटाने लढवलीच नव्हती. त्यामुळे शिंदे गटाचा जनाधार किती आहे याची परीक्षा झालीच नाही. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या मावळत्या लोकसभेतील पाच खासदारांची तिकिटे कापली गेली. सर्व्हेमध्ये जिंकून येण्याची शक्यता नाही, असे कारण सांगितले गेले. ही तिकिटे कापण्यासाठी भाजपाचा आग्रह होता. कारण अब की बारचा संकल्प साध्य करायचा असेल, तर निवडणुकीत जिंकणारेच उमेदवार हवेत हा त्यामागे हेतू होता. भावना गवळी (वाशीम-यवतमाळ), हेमंत पाटील (बुलढाणा), गजानन कीर्तिकर (मुंबई उत्तर - पश्चिम), राजेंद्र गावित (पालघर), कृपाल तुमाने (रामटेक) यांनी ठाकरेंच्या विरोधात झालेल्या उठावात एकनाथ शिंदे यांना साथ दिली, पण लोकसभेसाठी पक्षाची उमेदवारी त्यांना मिळाली नाही. भविष्यात त्याची भरपाई केली जाईल, असे त्या सर्वांना आश्वासन देण्यात आले आहे.

उद्धव ठाकरे यांच्या पक्षाचे उमेदवार २१ लोकसभा मतदारसंघांतून लढत आहेत, तर एकनाथ शिंदे यांच्या पक्षाचे उमेदवार १५ मतदारसंघांतून मैदानात आहेत. ठाकरे व शिंदे यांना आपल्या पक्षाचे जास्तीत जास्त उमेदवार निवडून आणणे हे प्रतिष्ठेचे बनले आहे. शिंदे हे मुख्यमंत्री आहेत आणि देशातील सर्वात बलाढ्य अशा भाजपाची ताकद त्यांच्या पाठीशी उभी आहे ही त्यांची मोठी जमेची बाजू आहे. शिवसेनेत मोठा उठाव झाल्यानंतरही ठाकरे यांच्या पक्षाच्या शिवसेनेच्या शाखांचे जाळे कायम आहे. गेल्या दोन वर्षांत संघटना बांधणी म्हणून शिंदे गटाने आपले किती नेटवर्क उभे केले व किती ठिकाणी ते मजबूत उभे राहिले याचा कस मतदानातून लागणार आहे. उद्धव ठाकरेंचे चिरंजीव आदित्य लोकसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी बरेच फिरले.

एकनाथ शिंदे यांचे चिरंजीव डॉ. श्रीकांत हे स्वत:च कल्याण मतदारसंघातून निवडणूक लढवत आहेत. शिवसेनाप्रमुखांचे पुत्र म्हणून उद्धव प्रत्येक सभेत आवर्जून सांगतात, एकनाथ शिंदे हे शिवसेनाप्रमुखांच्या विचारांचा वारसा सांगतानाच धर्मवीर आनंद दिघे यांचे कट्टर निष्ठावान शिष्य म्हणून संवाद साधताना दिसतात. उद्धव हे कोणताही प्रशासकीय व संसदीय अनुभव नसताना शरद पवार व सोनिया गांधींच्या मदतीने थेट मुख्यमंत्री झाले होते. एकनाथ शिंदे हे मोदी-शहांच्या आशीर्वादाने राज्याच्या सर्वोच्च पदावर बसले आहेत. ठाकरे यांनी सत्ता गमावली आहे, शिंदे यांनी सत्ता कमावली आहे. म्हणूनच मुंबईकर कोणाला कौल देणार हा कळीचा मुद्दा आहे. ठाकरे व शिंदे या दोन्ही नेत्यांपुढे आपला पक्ष टिकविण्याचे व जास्तीत जास्त खासदार निवडून आणून विधानसभा निवडणुकीचा पाया भक्कम करण्याचे आव्हान आहे.

शिंदे यांची शिवसेना राज्यात पंधरा लोकसभा मतदारसंघात निवडणूक लढवत असली तरी ठाकरे यांच्या शिवसेनेशी तेरा लोकसभा मतदारसंघात थेट लढत आहे. मुंबई, ठाणे, कल्याणमध्ये शिवसेना विरुद्ध उबाठा सेना अशी अग्निपरीक्षा आहे. मुंबईतील ३ तसेच ठाणे, कल्याण व नाशिक अशा सहा जागा वाट्टेल ते करून जिंकणे हे शिंदे यांच्यापुढे मोठे आव्हान आहे. मुंबई, ठाणे, कल्याण, नाशिकमधील संघर्ष म्हणजे दोन्ही शिवसेनेत, करो या मरो, अशी निकराची झुंज आहे.

मुंबई दक्षिणमध्ये शिवसेनेच्या उमेदवार यामिनी जाधव आणि उबाठा सेनेचे उमेदवार अरविंद सावंत अशी थेट लढत आहे. या मतदारसंघात महायुतीचे उमेदवार म्हणून राहुल नार्वेकर, मंगल प्रभात लोढा, मिलिंद देवरा अशी नावे प्रारंभी चर्चेत होती. यामिनी यांचे पती यशवंत जाधव हे मुंबई महापालिकेच्या स्थायी समितीचे तीन टर्म चेअरमन होते. ईडीच्या नोटिसा आल्याने जाधव कुटुंब वादाच्या भोवऱ्यात सापडले. पती-पत्नी दोघेही शिंदे गटात आहेत.

मुंबई उत्तर पश्चिममध्ये शिवसेनेचे उमेदवार रवींद्र वायकर व उबाठा सेनेचे उमेदवार अमोल कीर्तिकर यांच्यात लढत आहे. अमोल यांचे वडील गजानन कीर्तिकर हे मावळत्या लोकसभेत शिवसेनेचे खासदार होते. वायकर पती-पत्नी तसेच अमोल कीर्तिकरही ईडीच्या रडारवर आहेत. मुंबई दक्षिण-मध्य मतदारसंघात शिवसेनेचे राहुल शेवाळे व उबाठा सेनेचे अनिल देसाई अशी लढत आहे. शेवाळे हे मावळत्या लोकसभेत खासदार आहेत. अनिल देसाई यांच्याकडे राज्यसभेचे खासदार म्हणून अनुभव आहे.

ठाणे लोकसभा मतदारसंघात शिवसेनेचे उमेदवार नरेश म्हस्के व उबाठा सेनेचे राजन विचारे असा सामना आहे. येथून भाजपाचे संजीव नाईक लढण्यास उत्सुक होते, पण मतदारसंघ शिवसेनेला गेल्याने देवेंद्र फडणवीस यांना मध्यस्थी करून वाद शांत करावा लागला. कल्याण मतदारसंघात शिवसेनेचे उमेदवार मुख्यमंत्र्यांचे चिरंजीव डॉ. श्रीकांत शिंदे व उबाठा सेनेच्या वैशाली दरेकर-राणे यांच्यात लढत आहे. श्रीकांत हे मावळत्या लोकसभेत खासदार आहेत. पालघरमधून भाजपाचे डॉ. हेमंत सवरा यांच्याविरोधात उबाठा सेनेच्या भारती कामडी आहेत.मुंबईतील सहापैकी तीन जागांवर भाजपा लढत आहे.

उत्तर मुंबईतून केंद्रीय मंत्री पीयूष गोयल, उत्तर - मध्य मुंबईतून ड. उज्ज्वल निकम आणि इशान्य मुंबईतून मिहीर कोटेजा मैदानात आहेत. त्यांच्याविरोधात अनुक्रमे भूषण पाटील (काँग्रेस), वर्षा गायकवाड (काँग्रेस) व संजय दिना पाटील (उबाठा सेना) उमेदवार आहेत.सन २०१९ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत अविभाजित शिवसेनेने २२ जागा लढवल्या, १८ जिंकल्या. पैकी १३ खासदारांनी जुलै २०२२ मध्ये एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास दाखवला.

## उपदेशकथा: व्यवहारबुद्धी

एका गावामध्ये दृढ मैत्री असलेले चार ब्राह्मण पूत्र राहात होते. त्यापैकी तिघांनी शास्त्राची खूप घोकंपट्टी केली. पत्रव्यवहार, बुद्धी त्यांना अजिबात नव्हती. चौथा बुद्धिमान होता. त्याने कुठल्याच शास्त्राचा अभ्यास नुसत्या घोकंपट्टीने केला नव्हता. ते चौघे एकदा द्रव्य मिळविण्याच्या इच्छेने राजाकडे निघाले. वाटेत एका अरण्यात त्यांना सिंहाची हाडे दिसली. त्यापैकी एकाने हाडे गोळा करून सिंहाचा सांगाडा विद्येच्या सामर्थ्याने बनविला. दुसऱ्याने आपल्या विद्येने त्यात रक्त, मांस, कातडे घातले व तिसरा त्यात जीव ओतणार तोच बुद्धिमान असा चौथा म्हणाला, अरे थांब, हा सिंह जिवंत झाला तर आपणा सर्वांना खाऊन टाकील. त्यावर तिसरा म्हणाला, मूर्खा माझी विद्या मी अशी फुकट जाऊ देणार नाही. बुद्धिमान म्हणाला, मग थांब मी झाडावर चढतो मग त्यात जीव ओत. त्याप्रमाणे तो झाडावर चढल्याबरोबर तिसऱ्याने त्यात जीव ओतला. जिवंत झाल्याबरोबर सिंहाने डरकाळी फोडून तिघांनाही ठार केले. सिंह निघून गेल्यानंतर चौथा सावकाशपणे झाडावरून खाली उतरला.

**कथा उपदेश**

शास्त्राचा वापर व्यवहारबुद्धीने करावा.

# मशरूमचे हे फायदे वाचून तुम्ही लगेचच खाण्यास कराल सुरूवात

मुंबई: काही जणांना मशरूम(ïïहïï) खायला आवडत नाही. तुमचेही उत्तर जर हा असे आहे तर याचे एकदा फायदे जाणून घ्या थंडीच्या दिवसांत अनेक आजार आपल्या अवतीभवती असतात. अशातच आपले डाएट योग्य ठेवणे गरजेचे असते. या बदलत्या वातावरणाशी लढण्यासाठी आपण निरोगी असणे गरजेचे असते. अशातच मशरूम ही अशी गोष्ट आहे जी तुमच्या शरीराला अनेक फायदे मिळवून देते. मशरूम आपल्या आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर आहेत. हे तुम्ही सॅलड, सँडविच, पिझ्झा, मिक्स व्हेज, मंच्युरियन म्हणून खाऊ शकता.



व्हिटामिन डी मोठ्या प्रमाणात

व्यस्त वेळापत्रकामुळे अनेकांना उन्हात बसायला वेळ मिळत नाही. त्यामुळे व्हिटामिन डीची कमतरता होते. अशातच तुम्ही व्हिटामिन डीची कमतरता भरून काढण्यासाठी मशरूमचे सेवन करू शकता.

पोषकतत्वांनी भरपूर

मशरूममध्ये व्हिटामिन डी, बी, सेलेनियम, पोटॅशियम आणि कॉपर मोठ्या प्रमाणात असते. हे व्हिटामिन्स शरीराल विविध आजारांशी लढण्यास मदत करतात. सोबतच आरोग्य चांगले राखतात.

इम्युनिटी वाढते

मशरूममध्ये बायोॲक्टिव्ह कंपाऊंड मोठ्या प्रमाणात असतात जे इम्युनिटी वाढवण्यास मदत करतात. यात बीटा ग्लुकेन नावाचे तत्व असते जे थंडीत येणाऱ्या सर्दी तापासासाठी तसेच इन्फेक्शनविरोधात लढण्यास मदत करते.अँटीऑक्सिडंटचा खजाना

मशरूम्समध्ये मोठ्या प्रमाणात अँटी ऑक्सिडंट्स असतात जे सेल्युलार हेल्थ मजबूत करतात आणि स्ट्रेस रिलीज करतात.

वेट लॉसमध्ये फायदेशीर

वजन घटवण्यासाठी जे लोक दिवसरात्र मेहनत करत आहेत त्यांनी आपल्या डाएटमध्ये मशरूम्सचा समावेश करावा. यातील फायबर्स फॅट कमी करण्यास मदत करतात.

## सा.राशी भविष्य



२० मे २०२४ (पीएसआय)

मेष: शुभ रंग:लाल, शुभ दिशा :उत्तर
युवकांनी कोणत्याही प्रलोभनापासून दूर राहिलेले बरे. महिलांनी कुटुंबात शब्दाने शब्द वाढतो हे लक्षात ठेवा.

वृषभ : शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: पूर्व
आर्थिक व्यवहारात जातीने लक्ष घालणे आवश्यक. वडिलधाऱ्यांची सेवा करावी लागण्याची शक्यता.

मिथुन : शुभ रंग: पिवळा: शुभ दिशा: पूर्व
बौद्धिक क्षेत्रात चांगले नाव करता येईल. आर्थिकदृष्ट्या स्वत:च्या मनाप्रमाणे व्यवहार होतील.

कर्क : शुभ रंग:निळा, शुभ दिशा: पूर्व
महिलांनी कौटुंबिक छोट्याशा कारणांमुळे मूड घालवून बसू नका. कामाचे श्रेय न मिळाल्यानेही वाईट वाटेल.

सिंह : शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा:उत्तर
आपले हितसंबंध जपण्यासाठी एखाद्याच्या कार्यक्रमात जाऊन हजेरी लावावी लागेल.

कन्या :शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: पूर्व
नोकरी-व्यवसायात सध्या पावले उचलणे आवश्यक. कोठेही वादाची ठिणगी पडू देऊ नका.

तुळ : शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:पश्चिम
कामात केलेल्या सुधारणा आणि नव्या योजना कार्यान्वित करण्यास केलेली जमवाजमव यांचा फायदा पुढे होईल.

वृश्चिक : शुभ रंग :जांभळा,शुभ दिशा:दक्षिण
संततीच्या दृष्टीने येणाऱ्या शुभवार्ता अभिमानास्पद ठरतील. धार्मिक विधी केल्यामुळे आनंद मिळेल.

धनु : शुभ रंग: काळा, शुभ दिशा: पश्चिम
कोणाशी वादविवाद करणे किंवा कोणाच्या अतिआहारी जाणे टाळायला हवे. मुलांचे नवीन प्रश्न उद्भवतील.

मकर : शुभ रंग:पांढरा,शुभ दिशा: उत्तर
नोकरी-व्यवसायात अनेक संधी मिळणार आहेत. गोड बोलून कार्यभाग साधलेला बरा.

कुंभ : शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: पश्चिम
शेतकऱ्यांना दिलासा देणाऱ्या घटना घडतील. नशिबाची साथ मोठ्या प्रमाणात मिळेल.

मीन : शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: उत्तर
मित्र-मैत्रिणीचा किंवा घरातील सदस्यांचा जीवनातला महत्त्वाचा प्रसंग साजरा कराल.

२० मे ला जन्मलेल्या लोकांचा भविष्य

स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर शुक्र व चंद्राचा जास्तीत जास्त प्रभाव आहे. तुमच्याकडे नव्या निर्मितीची क्षमता आहे. संगीत, चित्रकला, साहित्य वगैरे कलात तुम्ही रस घेता व प्रत्यक्ष नैपुण्यही मिळवू शकता. इतरांच्या सुखदु:खांशी तुम्ही झटकन समरस होऊ शकता. सर्वांबलच तुम्हाला विलक्षण ममता आपुलकी वाटते. बऱ्याच वेळा तुम्ही काल्पनिक सृष्टीतच दंग असता. स्वप्नात रमण्यापेक्षा स्वप्ने प्रत्यक्षात आणण्यासाठी धडपड करणे महत्वाचे आहे. आपली मानसिक, आध्यात्मिक पातळी वाढवण्यासाठी तुम्ही मनापासून प्रयत्नशील असता. नैराश्याचा पगडा मनावर जास्त काळ बसू देऊ नका. उदासीनता आल्यास जलाशयाच्या काठी बसण्याची सवय ठेवल्यास तुमचा उत्साह, स्फूर्ती परत मिळतील. लोकांत मिसळा. मनावर परिणाम होऊन मनोविकार, निद्रानाश, नैराश्य अशा व्याधी जडतील. ध्यानधारणेचा पध्दतशीर अभ्यास करा.

कार्यक्षेत्र : स्वत:च्या अनुभवांवरून इतरांची भावनिक आंदोलने जुटवण्याचे सार्मथ्य असल्याने मनोविकारांची चिकित्सा हे तुमच्या दृष्टीने उत्तम कार्यक्षेत्र ठरेल. मनोविकारतज्ज्ञ, मनोविश्लेषक, व्यवसाय मार्गदर्शक, कुटुंबकल्याण सल्लागार म्हणून तुम्ही महत्वाची भूमिका बजावू शकाल. नाटक, चित्रपट, दूरदर्शन मालिकांचे लेखन, दिग्दर्शन, अभिनय यात उत्कर्ष होईल. दूध, आईस्क्रीम, वनस्पती उद्योगात भरीव यश मिळवाल.

प्रणयी जीवन : तुमचे मूड सतत बदलत असल्याने तुमच्याशी कसे वागावे हे तुमच्यात गुंतलेल्या माणसास कळत नाही. आपल्या व्यथा खोलवर समजून घेणारा जोडीदार तुम्हाला हवा असतो. महत्वाकांक्षेपेक्षा कुटुंबजीवनाला महत्व देणाऱ्या व्यक्ती तुम्हाला आवडतात. म्हणून २१ मार्च ते २० एप्रिल मधील व्यक्ती टाळा. मानसिक आधारासाठी जुलै २१ ते २० ऑगस्ट २१ मधील व्यक्ती निवडा.

वर्षफळ : नवी तांत्रिक पात्रता हस्तगत करू शकाल. चिकाटी व परिश्रमाच्या जोरावर आपल्या ध्येयाकडे वाटचाल करणे सोपे जाईल. जानेवारी फेब्रुवारी मध्ये उत्पन्नाचे नवे साधन उपलब्ध होईल. मार्च एप्रिल मध्ये जागा खरेदीचे बेत प्रत्यक्षात येऊ शकतील. मे जून मध्ये प्रशिक्षणासाठी, उसन्या सेवेसाठी निवड होईल. जुलै ऑगस्ट मध्ये समाजकारणात, राजकारणात सक्रीय योगदान राहील. ऑक्टोबर नोव्हेंबर मध्ये कार्यालयात मानसन्मानाचे योग चालून येतील.

महत्वाचे वर्ष : २, ११, २०, २९, ३८, ४७, ५६, ६५.

भाग्यरत्न : मोती

याच तारेखेची व्यक्ती : संत कबीर, विष्णूशास्त्री चिपळूणकर

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे,** संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** ईमेल : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com

# बियाणे, खते खरेदी करताना घ्यावयाची काळजी




कृषि क्षेत्राचे उत्पादन व उत्पादकता वाढविण्यासाठी राज्य शासनाचा कृषि विभाग सतत प्रयत्नशील आहे. शेतकऱ्यांना दर्जेदार व गुणवत्तापूर्ण बी-बियाणे, खतांचा पुरवठा वेळेत होण्यासाठी अनेक उपाययोजना कृषि विभागामार्फत केल्या जातात. उत्पादन वाढीसाठी लागणाऱ्या विविध निविष्ठांच्या दर्जास अनन्यसाधारण महत्त्व आहे. बियाणांमुळे उत्पादनात २० ते २५ टक्क्यांनी वाढ होते. तर खते पिकांना पोषकतत्वांचा योग्य पुरवठा करण्याची महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात.

शेतकऱ्यांनी येऊ घातलेल्या खरीप हंगामात बियाणे, खते व किटकनाशके खरेदी व फवारणी करताना काय काळजी घ्यावी याविषयी जाणून घेऊयाष्ठ

उत्पादन वाढीसाठी बियाणे, खते याबरोबरच किटकनाशकेही तितकीच महत्त्वाची आहेत. किटकनाशकांमुळे विविध कीडरोगांपासून संरक्षण होऊन उत्पादकता सुरक्षित ठेवण्यास मदत होते. निविष्ठांच्या उत्पादन, विक्री, वितरण, साठवणूक व वाहतूक आदी गुणवत्ता नियंत्रणासाठी विविध कायदे आहेत. पीकांचे नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी शेती निविष्ठा खरेदी करताना योग्य ती काळजी घेणे आवश्यक आहे.

गुणवत्ता व दर्जाची खात्री आवश्यक

गुणवत्ता व दर्जाची हमी देणाऱ्या अधिकृत विक्रेत्याकडूनच बियाणे व खते खरेदीस प्राधान्य द्यावे. पावतीसह खरेदी केल्यास बनावट व भेसळयुक्त बियाणे असण्याचा धोका टाळता येतो. पावतीवर बियाण्यांचा, खतांचा संपूर्ण तपशील जसे पीक, वाण, संपूर्ण लॉट नंबर, बियाणे कंपनीचे नाव, खरेदीदाराचे पूर्ण नाव व पत्ता, विक्रेत्याचे नाव नमूद असल्याची खात्री करावी. खरेदी केलेल्या बियाण्याचे वेष्टन पिशवी, टॅग, खरेदीची पावती व त्यातील थोडे बियाणे, खते पिकाची कापणी होईपर्यंत जपून ठेवावे. भेसळीची शंका दूर करण्यासाठी बियाणांची, खतांची पाकीटे सिलबंद, मोहोरबंद असल्याची खात्री करावी. तसेच पाकीटांवरील अंतिम मुदत तपासून घ्यावी.

खरेदी केलेली बियाणे त्या हंगामासाठी शिफारस केल्याची खात्री करावी. बियाण्याची निवड ही जमीन व ओलीताची साधने लक्षात घेऊन करावी. कमी वजनाच्या निविष्ठा तसेच छापील किंमतीपेक्षा जास्त किमतीने विक्री अथवा इतर तक्रारीसाठी नजीकच्या कृषि विभागाच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.

फवारणी करताना घ्यावयाची काळजी

किटकनाशके वापरताना संरक्षक कपडे वापरावेत. किटकनाशकाला हुंगणे किंवा वास घेणे टाळावे. तणनाशके फवारणीसाठी वेगळा पंप वापरावा. मिश्रण हाताने न ढवळता लांब दांडयाचा किंवा काठीचा वापर करावा. फवारणी करताना लहान मुले, जनावरे, पाळीव प्राणी यांना त्याठिकाणापासून दूर ठेवावे. किटकनाशकांच्या रिकाम्या बाटल्या नष्ट कराव्यात. किटकनाशके फवारण्याचे काम दर दिवशी आठ तासापेक्षा जास्त वेळ करु नये. शिल्लक राहिलेले द्रावण तयार केल्याच्या २४ तासानंतर वापरु नये. कडक उन्हात किंवा जोरदार वाऱ्याच्या परिस्थितीत तसेच पाऊस पडण्यापूर्वी अथवा पाऊस पडल्यानंतर लगेच फवारणी करु नये.

केंद्र शासनाने अनुदान वितरणाच्या पद्धतीत बदल करुन अनुदान खत विक्रीनंतर लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा करणेबाबत थेट लाभ हस्तांतरण प्रकल्प संपूर्ण राज्यात १ नोव्हेंबर २०१७ पासून सुरु केला आहे. या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना खत खरेदी करताना आधारकार्ड असणे अनिवार्य आहे. खत खरेदी करताना शेतकऱ्याने त्याचा बोटाचा ठसा मशीनवर ठेवावयाचा आहे व त्याचा आधार नंबर विक्रेत्याने मशीनवर नोंद केल्यास त्याची ओळख नोंद होते किंवा आधार क्रमांक मशीनवर नोंदवल्यास लाभार्थ्याच्या मोबाईलवर ओटीपी जाऊन त्याची नोंद केल्यास जी खते खरेदी करावयाची आहेत, त्याचे देयक तयार होते. त्याची रक्कम अदा करुन शेतकऱ्याना खते खरेदी करता येतात. कृषि निविष्ठांविषयी असलेल्या अडचणी, तक्रारी सोडवण्यासाठी तसेच अन्य मार्गदर्शन मिळवण्यासाठी कृषि विभागाच्या टोल फ्री क्रमांक १८०० २३३ ४००० वर संपर्क साधावा. शेतकऱ्यांनी आपल्या तक्रारी प्रत्यक्ष, दूरध्वनी, ईमेल अथवा एसएमएसद्वारे नोंदवून शासनाच्या गतिमान गुणनियंत्रण अभियानात सहभागी व्हावे.

# कोकणात परप्रांतीय स्थिरावतात, पण!

महाराष्ट्रातील कोकण प्रांत वैशिष्ट्यपूर्ण आहे. इथे पिकणाऱ्या फळांचं कौतुक जगाला आहे. सृष्टीसौंदर्य, समुद्रकिनारा, खाडी असं बरंच काही सौंदर्य आहे. त्यामुळे सौंदर्याने नटलेला हा प्रदेश समाधानी वृत्तीने जगण्या-वावरणाऱ्यांचा असलेला आहे. सर्वकाही आहे; परंतु कोकणात काहीच नाही अशी मानसिकता आणि समजूत आपणच करून घेतली आहे. कोकणात कोकण रेल्वे येण्यापूर्वी काहीच नाही म्हणून आपणच गळा काढत होतो. कोकणातून महाराष्ट्राच्या राजधानीतून आणि देशाच्या राजधानीतूनही रेल्वे धावू लागल्या. त्या अगदी आपल्या राज्याच्या सीमेपलीकडच्या तीन-चार राज्यांत रेल्वे जाते. कोकणात रेल्वे धावू लागली की, रेल्वेच्या वेगाने कोकणात विकासप्रक्रियाही वेग घेईल असं सर्वांनाच वाटत होतं; परंतु कोकणात आजच्या घडीला सर्वच व्यवसायात कोकणचा टक्का कमी होऊन परप्रांतीयांची संख्या फार मोठ्या प्रमाणावर वाढली आहे.

कोकणामध्ये परप्रांतीय आले, ते व्यवसायात स्थिरावले म्हणून कोणीही बोटं मोडण्याची आवश्यकता नाही. व्यवसाय उद्योगासाठी परप्रांतीयांच्या अंगी असणारे गुण आपल्यामध्ये नाहीत. संयमाचा प्रचंड अभाव आपल्यामध्ये आहे. कोणताही व्यवसाय, उद्योग उभारण्यासाठी व्यवसायात स्थिरता येण्यासाठी काही सोसण्याची मानसिकता हवी. कोकणातील जे व्यावसायिक सहनशिलतेने कष्ट करत राहतात ते आपोआपच स्थिरावलेलेच दिसतात. गेल्या दहा-पंधरा वर्षांमध्ये कारागिरीत उत्तर प्रदेश, कर्नाटक, बिहारचे तरुण दिसतात. उसाचा रस, ज्युस सेंटर चालवणारे सर्वच परप्रांतीय आहेत. अगदी सहज म्हणून या अशा रसवंती चालविणाऱ्यांकडे विचारलं तर ते सांगतात कोण सांगतो दहा वर्षे झाली. कोण म्हण-तो पाच वर्षे झाली. मुंबई-गोवा महामार्ग क्रमांक ६६ या महामार्गाचे चौपदरीकरण झाले. या महामार्गाच्या दोन्ही बाजूला शहरातील चौकातील मुख्य जागांवर जवळपास सर्वच परप्रांतीय दिसतात. अपवादानेही स्थानिक तरुण दृष्टीस पडत नाहीत. कोकणात काही काम नाही, काय करायचं? असा प्रश्न घेऊन वावरणारे अनेक तरुण दिसतात.



आज महामार्गावरील रस्त्यांच्या बाजूला उभ्या असलेल्या रसवंती सेंटर, ज्युस सेंटरला जागेचं भाडं नाही की काही नाही; परंतु व्यवसाय उभा राहण्यासाठी आवश्यक असणारा ङ्गसंयमम त्या परप्रांतीयांपाशी असतो. म्हणूनच परक्या मुलखातही ङ्गतुमका किती ग्लासा रस देवफ यासारखी अस्खलित मालवणी भाषेतील वाक्य सहज बोलून जातात. काही वर्षांनंतर हा परप्रांतातून आलेला आहे की इथलाच कोकणातलाच माल-वणी मुलखातला आहे हेच कळेनासं होतं. इतका इथल्या भागाशी जुळून घेतात. बेकरी, टायर या उद्योगात केरळ, राजस्थानी लोकांनी पाय रोव-लेत. एक आठवलं म्हणून सांगतो, कोकणातील स्विटमार्ट व्यवसायात गुजराती किंवा राजस्थानी दिसतात. कुडाळच्या पुरोहित स्विटमार्टचे जालमसिंह पुरोहित यांनाही कुडाळात अनेक वर्षे झाली.

कोकणात कोकण रेल्वे सुरू झाली तेव्हा कुडाळ रेल्वे स्थानकावरील टी-स्टॉल पुरोहित यांनी घेतला. रेल्वेत जेवण, स्नॅक तेव्हा पुरोहितच पुरवीत असत. कदाचित आजही तेच पुरवत असावेत. एका कोकणवासीयांशी जालमसिंह पुरोहित बोलत होते. जालमसिंह मालवणी खूप छान बोलतात. त्या मालवणी मुलखातल्या मुंबईकर चाकरमान्याशी संवाद सुरू असताना तो चाकरमानी जालमसिंह म्हणाला बरा झाला, या खाना-बिना पुरवूचा कॉन्ट्रॅक्ट तुम्हीच आपल्या मालवणी माणसान घेतल्यान ता. नायतर कोणतरी गुजराती, राजस्थ-ानी मारवाड्यानं घेतल्यानं आसता. जालम मनात हसले. पण त्यातही ते समाधानी होते की, आपण या मुलखाशी किती जोडले गेले आहोत त्याचाही त्यांना आनंद झाला.

व्यावसायिकता अंगी अस-ावी लागते किंवा ती अंगी वसवावी लागते तरच ते शक्य होते. नाहीतर ती शक्य नसते. कोकणातील अलीकडे काही तरुण शेतीत रमताना दिसतात. म्हणूनच कोकणातील कृषीक्षेत्रात वाढ झालेली दिसते. कलिंगड, भाजीपाला करताना अनेक तरुण दिसतात; परंतु पूर्णत: सर्वकाही निसर्गावर अवलंबून राहावे लागते. कलिंगडाच्या बाबतीत अनेक तरुण शेतकरी तोट्यात जातात; परंतु झालेलं नुकसान पुढच्या वर्षी भरून निघेल याच आशेवर नव्याने सुरुव-ात करतात. कोकणात सध्या गेली काही वर्षे पर्यटन बहरत आहे. कोकणात पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांची संख्या दरवर्षी वाढत आहे. पर्यटनाच्या व्यवसायात कोकणातील सर्वसामान्यजनही जोडले गेले आहेत. आज असंख्य कुटुंब पर्यटन व्यवसायामुळे स्थिरावली आहेत; परंतु या व्यवसायातही सचोटी हवी. येणारा ग्राहक वारंवार आपल्याकडे आलाच पाहिजे यासाठी त्या ग्राहकाला आपण जपले पाहिजे. तसं घडत नसेल तर यापुढच्या काळात कोकणातील सर्वच व्यवसायिकांनी ही काळजी घेण्याची अत्यंत आवश्यकता आहे.

कोकणातील काही तरुणांना आपल्याच कामाची लाज वाटते. मुंबई-पुणेसारख्या शहरात जाऊन पाच-दहा हजार रुपयांत इथला तरुण काम करेल; परंतु कोकणातील रस्त्याच्या कडेला एखाद्या लिंबू सरबताचा स्टॉल चालवायला लाज वाटते. कोणताही व्यवसाय करण्यासाठी अधिकचे कष्ट घेण्याची तयारी असायला हवी. आपल्याकडे नोकरी, व्यवसायाला प्राधान्य दिले जात नाही. अधिकचे कष्ट घेण्याची मानसिकता नाही. कोणत्याही बाजारात विश्र्वासार्हता निर्माण करावी लागते. ती सहजतेने निर्माण किंवा प्राप्त करता येत नाही. ती जपावी लागते. केवळ विश्र्वासार्हतेमुळेच व्यवसायात गतीमानतेने प्रगती करता येऊ शकते. पूर्वपिढीचे व्यवसाय आजच्या पिढीने सोडले आहेत. कोकणातील प्रमुख बाजारपेठेत म्हणूनच कोकणचा मूळ व्यापारी कुठे दिसत नाही. परप्रांतीय या व्यवसायात मोठ्या प्रमाणात आले आहेत.

ङ्गयेवा कोकण आप-लाच आसाफ म्हणत आपले पूर्वपिढीचे असलेले व्यवसाय अनेक तरुणांनी बंद केलेत. परप्रांतीयांनी व्यवसाय थाटले आहेत आणि विशेष म्हणजे ते अतिशय चांगल्यारितीने व्यवसायात स्थिरावले आहेत. खुल्या बाजारपेठेत कोणालाही रोखता येणारे नाही. या स्पर्धेत टिकून राहावे हीच खरी कसोटी आहे. यामध्ये आप-ला व्यवसाय उभा करून त्यात ठामपणाने उभे राहिले पाहिजे. कोकणात जर परप्रांतीय येऊन स्थिरावत असतील आणि आपल्या कोकणातील तरुण नोकरीच्या शोधात मुंबई गाठत असतील, तर ते दुर्दैवच म्हणावं लागेल. जो व्यवसाय परभागातून येऊन इथे करत असतील, तर आपल्याकडील तरुण का करीत नाहीत? या प्रश्नाचं उत्तर लाज वाटते. कष्ट नकोत असचं असू शकतं. नाही का ?

# मधुमेह: जवसाच्या बियाण्यांनी संपेल रक्तातील साखर

मधुमेह: मधुमेहावर कोणताही इलाज नाही, तो फक्त नियंत्रित केला जाऊ शकतो. उत्तम आहार आणि जीवनशैली रुग्णाला सहज नियंत्रित करू शकते. अशा परिस्थितीत तज्ज्ञ साखरेच्या रुग्णांना त्या गोष्टी खाण्याचा सल्ला देतात. ज्याचा ग्लायसेमिक इंडेक्स खूपच कमी आहे. यासाठी वास्तविक बियाणे देखील चांगले मानले जाते. यामुळे रक्तातील साख-रेची पातळी नियंत्रित ठेवता येते मधुमेह : देशात मधुमेहाचे रुग्ण झपाट्याने वाढत आहेत . लाखो लोक मधुमेहाने जगत आ-हेत. जेव्हा मधुमेह होतो तेव्हा रुग्णाच्या रक्तातील साखरेची पातळी नियंत्रणाबाहेर जाते. त्यामुळे सर्व प्रकारच्या समस्या निर्माण होतात. सध्या मधुमेहावर कोणताही इलाज नाही. यामुळेच सकस आहार आणि व्यायामाने यावर नियंत्रण ठेवता येते. अशा परिस्थितीत जवसाच्या बिया मधुमेहाच्या रुग्णांसाठी खूप फायदेशीर ठरू शकतात . या बियांचा ग्लायसेमिक इंडेक्स खूपच कमी असतो. यामध्ये फायबर मोठ्या प्रमाणात आढळते. त्यामुळे रक्तातील साखर कमी होण्यासोबतच शुगरच्या रुग्णाला येणारा थकवाही दूर होण्यास मदत होते.

झच् किसान योजना: झच् किसान योजनेच्या १४व्या हप्त्याला उशीर, जाणून घ्या कारण

मधुमेहाच्या रुग्णांनी दररोज एक छोटा चमचा अंबाडीच्या बियांचे सेवन करावे. याच्या सेवनाने साखरेची पातळी वाढत नाही. यासाठी प्रथम हे बिया हलके भाजून घ्या आणि नंतर थंड करा. नंतर ते चांगले चावून खा. दिवसा आणि रात्री जेवण करण्यापूर्वी अर्धा तास आधी या बिया खाव्यात हे लक्षात ठेवा.

चहासोबत बिस्किटे खाताय काळजी घ्या, तुम्ही अनेक आजारांना बळी पडू शकता



अंबाडीच्या बियांमध्ये फायबर साठवणे

फ्लेक्स बिया हे सुपर फूड मानले जाते. याचे कारण म्हणजे त्यामध्ये फायबर, ओमेगा ३ फॅटी आणि प्रोटीनसारखे घटक मोठ्या प्रमाणात असतात. या गुणधर्मांमुळे, फ्लॅक्ससीड्स कर्करोग होण्याचा धोका कमी करण्यासाठी, संधिवात टाळण्यासाठी, हृदयाचे आरोग्य सुधारण्यासाठी आणि मधुमेहामध्ये रक्तातील साखर नियंत्रित करण्यासाठी कार्य करतात. अंबाडीच्या बियांमध्ये विरघळणारे आणि अघुलनशील असे दोन्ही प्रकारचे फायबर असतात. यामुळेच अंबाडीच्या बिया मधुमेहाच्या रुग्णांसाठी उत्तम असतात. सर्वात महत्त्वा-चे म्हणजे, फायबर तुम्हाला बद्धकोष्ठता टाळण्यास आणि आतड्याच्या कार्याला चालना देण्यास मदत करते. यामुळे पचनक्रिया मजबूत होते. णखऊख ची संधी: आधार कार्ड विनामूल्य अपडेट करा १४ जूनपर्यंत जवस पावडर देखील फायदेशीर आहे दररोज १० ग्रॅम फ्लॅक्ससीड पावडरचे सेवन केल्यास रक्तातील साखरेची पातळी २० टक्क्यांपर्यंत कमी होण्यास मदत होते. एका अभ्यासात असे म्हटले आहे की जे लोक दररोज ५ ग्रॅम फ्लेक्ससीडचे सेवन करतात. त्यांना उपवासाच्या रक्तातील ग्लुकोजमध्ये १२ पट घट झाल्याचे दिसून आले आहे.

शेती : या आहेत ५ महागड्या हिरव्या भाज्या, शेती करून बनणार श्रीमंत, जाणून घ्या खासियत जवस decoction


जर तुम्हाला हवे असेल तर तुम्ही त्याचा डेकोक्शन करूनही सेवन करू शकता. त्याचा डेकोक्शन प्यायल्याने रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित राहण्यास मदत होईलच. उलट वजन, बीपी, थायरॉईड आणि पोटाशी संबंधित अनेक आजारांपासून आराम मिळतो. फक्त लक्षात ठेवा की जवसाचा प्रभाव गरम आहे. त्यामुळे याचे जास्त सेवन करू नका.

कसे बनवावे सर्व प्रथम, एक भांडे मंद आचेवर ठेवा.

यानंतर दोन चमचे जवसाच्या बिया दोन कप पाण्यात मिसळून भांड्यात ठेवा.आता पाणी अर्धे होईपर्यंत उकळवा.त्यानंतर गॅस बंद करून गाळून घ्या.

ते थोडे थंड झाल्यावर प्या. तिळ-ाची लागवड: बिहारच्या शेतकऱ्यांनी अशा जमिनीवर तिळाची लागवड करावी, बंपर उत्पादन मिळेल.

## यशवंत महाशब्दकोडे



आडवे शब्द
१. व्याकूळ, घाबरलेला
५. असामान्य
८. पान (सं.)
९. दृष्ट
१०. 'पुरी'चे दैवत
१२. मोठा नगारा
१३. नवरदेव
१४. व्याख्यान
१५. रेशमचा किडा
१६. अंदाज, तर्क
१८. राबता, जाणे-येणे
२०. प्रमाणपत्र
२२. मच्छर
२४. स्वाभिमानी स्त्री
२५. पल्लवीने रेणुका शहाणेच्या चित्रपटात साकारलेली भूमिका
२७. धमकी, श्वास
३०. व्यवस्थित
३२. अखबार
३३. कासंडी, दुधाची घागर
३४. हाताचा एक अवयव
३६. व्यवस्था
३८. ऋण, व्याजाने घेतलेली रक्कम
४०. जहाजांचा मुक्काम
४१. फळातील द्रव
४२. हाताने सूत काढून हातमागावर विणलेले कापड
४३. पंगत
४५. दरोडा
४७. अपशकुन
५०. नकला करणारा
५२. हिशोबाची एक बाजू
५४. यात्रेत नियमित जाणारा
५६. दुधाच्या वड्या
५८. शेजारी शेजारी
६०. झकास
६१. एक मंगलवाद्य
६३. निवासस्थान
६४. समोरसमोरची चकमक
६५. पूर्णपणे
६७. एक सुगंधी वनस्पती
६८. समुद्र
७०. रमणीय
७१. असुर, दानव, देवांचा शत्रू
७२. गाजावाजा
७३. किंमत, पैसा
७४. विशेष
७५. चंद्र
७६. निकट, जवळ
७८. भूकंप
८०. मलई
८१. फरक
८२. घराणे
८३. रंग बदलणारा प्राणी

उभे शब्द
१. यजमानीण
२. पहारेकरी
३. कलंक
४. सुकुमार
५. न थांबता
६. धैर्य
७. दारूचा एक प्रकार
८. उद्याच्या नंतरचा दिवस
११. गर्दीचा विळखा
१३. भावाची पत्नी
१५. कृत्रिम शीतपे (इंग्रजी) उन्हाळ्यात या कंपन्यांमध्ये शीतयुद्ध रंगते!
१७. धार्मिक पर्यटन
१८. महिला, बाई
१९. प्रफुल्लित
२१. पटपट, वेळ न दवडता
२३. मानसिक धक्का (हिंदी)
२६. वस्तूचा छोटा तुकडा
२८. समोरच्याच्या मनातील विचार ओळखणारा
२९. वार्ताहर
३०. पाणी
३१. आई-वडील
३३. सूत काढण्याचे एक साधन
३५. आरोळी, ललकारी
३७. जिव्हा
३९. मळलेले
४०. आपला नसलेला
४४. अरण्य
४६. अंजन
४८. चेष्टेखोर
४९. न वापरलेली, नवी
५१. दुलई
५३. चौसोपी वाड्यातील मधली खोली
५५. लेखणी
५६. भिऊन पळ काढणारा
५७. भटकणारा
५९. आशीर्वाद
६१. माळ, हार
६२. नुकतेच आगमन झालेला, नवखा
६४. तुलनेतील सारखेपणा
६५. अनुत्तीर्ण
६७. चर्चा
६८. लाकडाची उत्कृष्ट जात
६९. रानरेडा
७०. सुंदर तरुणी
७३. दरवाजा
७४. मृत्तिकापात्र
७५. सुविधा
७७. मगज
७८. द्रव्य
७९. बीजगणितात आढळणारा श्रीकृष्णाचा मामा

कोडे क्र.६ चे उत्तर


आडवे उत्तर
१.कावराबावरा ५.असाधारण ८.पर्ण ९.खट १०.जगन्नाथ १२.डम १३.वर १४.भाषण १५.कोसरा १६.कयास १८.वहिवाट २०.दाखला २२.डास २४.मानिनी २५.रटरट २४.दम ३०.नीट ३२.वर्तमानपत्र ३३.चरवी ३४.मनगट ३६.कारभार ३८.कर्ज ४०.पडाव ४१.रस ४२.खादी ४३.भोजनावळ ४५.डाका ४७.नाट ५०.नकलाकार ५२.जमा ५४.वारकरी ५६.पनीर ५८.जवळजवळ ६०.मस्त ६१.सनई ६३.घर ६४.सामना ६६.पुरता ६७.मरवा ६८.सागर ७०.रम्य ७१.राक्षस ७२.गवगवा ७३.दाम ७४.खास ७५.सोम ७६.लगत ७८.धरणीकंप ८०.साय ८१.अंतर ८२.खानदान ८३.सरडा

उभे उत्तर-१.कारभारीण २.राखणदार ३.बाट ४.राजस ५.अथक ६.धाडस ७.रम ८.परवा ११.गारडा १३.वहिनी १५.कोलार १७.यात्रा १८.वनिता १९.टवटवीत २१.खटपट २३.सदमा २६.टवका २८.मनकवडा २९.पत्रकार ३०.नीर ३१.जनकजननी ३३.चरखा ३५.गर्जना ३७.रसना ३९.मळकट ४०.परका ४४.वन ४६.काजळ ४८.टवाळ ४९.कोरी ५१.रजई ५३.माजघर ५५.कलम ५६.पळपुटा ५७.रमताराम ५९.वर ६१.सर ६२.नवागत ६४.साम्य ६५.नापास ६७.मसलत ६८.सागवान ६९.गवा ७०.रमणी ७३.दार ७४.खापर ७५.सोय ७७.गर ७८.धन

# रॉंग साईडने आला भरधाव ट्रक, समोरुन येणाऱ्या कारचा चेंदामेंदा

अकोला,१९ – जिल्ह्यातील पातुर तालुक्यातल्या चान्नी फाट्यावरील एका नदीच्या पुलावरील अपघाताची घटना ताजी असतानाचा आणखी एक भीषण अपघाताची घटना पातूर तालुक्यात घडली आहे. भरधाव येणाऱ्या ट्रक आणि कारचा भीषण अपघात होऊन तीन जण गंभीर जखमी झाले आहेत. आज दुपारी २ वाजताच्या सुमारास ही अपघाताची घटना घडली. या घटनेनंतर स्थानिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत मतदकार्य सुरू केले होते. त्यानंतर, पोलिसांनीही घटनास्थळी धाव घेऊन घटनेचा पंचनामा केला आहे. जखम ींना तत्काळ शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात येत आहे.

अकोल्या जिल्ह्यातल्या अकोला–पातुर रस्त्यावर ट्रक आणि कारचा आज दोनच्या सुमारास भीषण अपघात झाला. या अपघात ३ जण गंभीर जखमी झाले असून जखमींना तातडीने स्थानिक नागरिकांच्या मदतीने अकोल्याच्या शासकीय रुग्णालयात उपचारासाठी रवाना करण्यात आलं आहे. अकोला जिल्ह्यातील पातुर–अकोला रस्त्यावरील चिखलगाव गावाजवळ हा अपघात झाला. जनावरांचं कुटार वाहून नेणारा ट्रक रॉंग साईडनं आल्यामुळे समोरुन येत असलेल्या कारला जोराची धडक बसली. ट्रक व कारच्या भीषण धडकेत कारमधील तिघे जण जखमी झाले आहेत. अपघातानंतर ट्रक रस्त्यावर पलटी झाला असून कारचा अक्षरशः चुराडा झाल्याचे दिसून येत आहे. या घटनेची माहिती मिळताच पातुर पोलीस घटनास्थळी दाखल झाले आणि अपघाती वाहनांना बाजूला करून वाहतुकीचा मार्ग सुरळीत करण्याचे काम सुरू केले. एमएच ३० डीबी ७६२६ क्रमाकांची निळ्या रंगाची कार या अपघातात पूर्णपणे उध्वस्त झाली आहे. अकोला जिल्ह्यातील पातुर तालुक्यातल्या चान्नी फाट्यावरील एका नदीच्या पुलावरून दोन्ही वाहनं जात असताना भीषण अपघात झाला, शनिवारी सायंकाळच्या सुमारास ही घटना घडली होती. नदीवरील पूल छोटा असल्यामुळे ट्रक चालकाचं वाहनावरील नियंत्रण सुटलं आणि ट्रक कारवर पलटी झाला. अरुंद रस्त्यावरुन ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नातून ट्रकचालकाचे नियंत्रण सुटले अन् शेजारुन जात असलेल्या कारवर हा तांदळाच्या पोत्यांनी भरलेला ट्रक कोसळला. या अपघातात ट्रक खाली कार दबल्या गेल्यानं कारमधील प्रवासी वाहनात अडकले होते. मात्र, स्थानिक नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत, त्यांना सुखरूपपणे बाहेर काढले. सुदैवानं या अपघातात कोणालाही म ोठी दुखापत झाली नसून कारमधील ४ जण किरकोळ जखमी झाले आहेत. चान्नी फाट्यावरील अरुंद पुलावरच ट्रक कोसळल्याने ट्रकमधील तांदुळाचे पोते पुलाखाली पडले आहेत. तर, ट्रक शेजारुन जाणारी कार ट्रकच्या ओझ्याखाली दबल्याने तिचे मोठे नुकसान झाले आहे.



नेपाळमधील ललितपूर येथील पाटण संग्रहालयाला भेट देणारे लोक.

# काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष प्रतापराव भोसले यांचे निधन

सातारा,१९– काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी मंत्री आणि काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष प्रतापराव भोसले यांचे त्यांच्या सातारा जिल्ह्यातील भुईंज गावी वृद्धापकाळाने निधन झाले. ते ९० वर्षांचे होते.

त्यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत दु:खद व वेदनादायी आहे, अशा शब्दांत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी भोसले यांच्या निधनाबद्दल दु:ख व्यक्त केले आहे.

प्रतापराव भोसले यांचा राजकीय प्रवास सातारा जिल्ह्यातील भुईंज गावच्या सरपंचपदापासून सुरु झाला. वाई खंडाळा विधानसभा म तदारसंघातून त्यांनी चार वेळा विजय संपादन करुन राज्याच्या विधानसभेत प्रतिनिधित्व केले.

कॅबिनेट मंत्री म्हणून त्यांनी सातारा जिल्ह्याच्या विकासात मोठे योगदान दिले. त्यानंतर सातारा लोकसभा मतदारसंघातून १९८४, १९८९ आणि १९९१ अशा तीन लोकसभा निवडणुकीत विजय संपादन करुन ते लोकसभेत गेले. या काळात त्यांनी अनेक महत्त्वाच्या समित्यांवर काम केले.

१९९७ साली काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षपदी त्यांची नियुक्ती झाली. त्यांच्या कार्यकाळात झालेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला विजय मिळवून देत राज्यात सत्ता आणली. प्रतापराव भोसले यांना पक्षाने जी जबाबदारी दिली ती त्यांनी समर्थपणे पार पाडली. संधीचे सोने करत त्या पदाला न्याय देण्याचे काम त्यांनी केले.

आपल्या कारकिर्दीत त्यांनी राजकारणाबरोबर कृषी, सहकार, शैक्षणिक क्षेत्रातही भरीव काम केले. शासनाच्या विविध योजना सातारा जिल्ह्यात राबवण्याचे काम त्यांनी केले. त्यांच्या निधनाने कधीही न भरून येणारी पोकळी निर्माण झाली आहे. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी भोसले कुटुंबियांच्या दु:खात सहभागी आहे, असे नाना पटोले म्हणाले.

# जेवणाची ऑर्डर लवकर देत नाही म्हणून हवेत गोळीबार

## नाशिकात सिनेस्टाईल पाठलाग करत चौघांना बेड्या

नाशिक,१९ – हरसूल येथे एका हॉटेलात मद्यधुंद अवस्थेत जेवणासाठी गेलेल्या नाशिकसह परजिल्ह्यातील चार सराईत गुंडांनी गावठी पिस्तुलातून सात राऊंड हवेत फायर करून नाशिककडे पळ काढला. ही माहिती कळताच गंगापूर पोलिसांनी नाकाबंदी करून भरधाव इनोव्हा कार अडविण्याचा प्रयत्न केला. म ात्र, संशयितांनी पोलिसांना न जुमानता पळ काढला. यानंतर चोर आणि पोलिसांचा खेळ सुरू झाल्यावर पळून जाणाऱ्या चौघा सराईतांचा पाठलाग करून गावठी पिस्तुलासह गजाआड करण्यात यश आले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, इम्रान अयनूर शेख (२५, रा. गणेशचौक, संजीवनगर, अंबड लिंकरोड, नाशिक), शेखर दिलीपराव कथले (२९, रा. शिवाजीनगर ता. सेलू, जि. परभणी), अरबाज शब्बीर खान पठाण (२३, रा. डिग्रसवाडी, सेलू, जि. परभणी) व राहुल श्याम क्षत्रिय (२४, रा. साईबाबा मंदिराच्या बाजूला, संत जनार्दननगर, नांदूरनाका, नाशिक) अशी अटक केलेल्या सराईत संशयितांची नावे आहेत.

हवेत सात राऊंड केले फायर

याबाबत अधिक माहिती अशी की, हरसूल येथील हॉटेल कश्यपी फोर्ट येथे चौघेही संशयित मद्य पिऊन जेवण करण्यासाठी आले. त्यांनी हॉटेलात ऑर्डर देऊन जेवण केले. यानंतर काहीतरी ऑर्डर दिल्यावर ती लवकर का आणली नाही, यातून वाद घालत एकाने जवळील गावठी पिस्तुलातून हॉटेलचा मॅनेजर आणि वेटरच्या समोर सात राऊंड हवेत फायर केले.

चौघे इनोव्हातून पसार

त्यानंतर धाकाने चौघे इनोव्हात बसून नाशिकच्या दिशेने पळाले. ही माहिती हरसूल पोलिसांना कळविण्यात आली. त्यांनी गुन्ह्याचा तपास करताना गंगापूर पोलिसांना संशयित नाशिकमार्गे येत असल्याची माहिती दिली. त्यानुसार गंगापूर पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ निरीक्षक तृप्ती सोनवणे यांनी डीबीचे उपनिरीक्षक मोतीलाल पाटील, हवालदार रवींद्र मोहिते, गणेश रेहरे, सचिन काळे आदींना नाकाबंदीसह संशयितांना पकडण्याचे आदेश दिले.

चौघांना पोलिसांनी ठोकल्या बेड्या

त्यानुसार, एमएच २० सीए ९५९५ ही संशयास्पद इनोव्हा गिरणारे येथून गंगापूर रोडकडे येत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पथकाने गंगापूर जकात नाक्याजवळ इनोव्हा थांबविण्याचा प्रयत्न केला. तेव्हा संशयित चालकाने कार न थांबविता पळून जाण्याचा प्रयत्न केला. तेव्हा पोलिसांनी डीबी मोबाइल कारने पाठलाग करून इनोव्हा गंगापूर गाव जकात नाक्याजवळ अडविली. तेव्हा चौघांनी पळून जाण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांचा पाठलाग करून पकडण्यात आले. या कारवाईत इनोव्हा कार, एक पिस्तूल हस्तगत करण्यात आली आहे.

# निवडणूक काळात कोट्यावधींचा निधी जप्त

मुंबई,१९ – देशात सध्या लोकसभा निवडणुकींचा माहोल सुरु आहे. चार टप्प्यातील मतदान प्रक्रिया पार पडली आहे. पाचवा टप्पा उद्या (१९ मे) रोजी पार पडणार आहे. दरम्यान, या लोकसभा निवडणुकीच्या काळात आत्तापर्यंत कोट्यावधी रुपयांचा निधी जप्त करण्यात आला आहे. आत्तापर्यंत तब्बल ८८८९ कोटी रुपये जप्त केले आहेत. म्हणजे लवकरच हा आकडा ९००० कोटी रुपये पूर्ण करण्याची शक्यता आहे.

देशात सध्या सुरू असलेल्या लोकसभा निवडणुकीच्या काळात पैशांचा गैरवापर आणि मतदारांना दाखवण्यात येणाऱ्या इतर प्रलोभनांवर निवडणूक आयोग नजर ठेऊन आहे. यामध्ये विविध संस्थांनी आत्तापर्यत तब्बल ८८८९ कोटी रुपये जप्त केले आहेत. अंमली पदार्थ आणि मानसिक उपचारांसाठीची औषधे तसेच इतर प्रलोभनांविरूद्ध वाढीव दक्षतेमुळे हे पदार्थ मोठ्या प्रमाणात जप्त केले आहेत. जप्ती प्रकरणात सतत वाढ झाली आहे. आतापर्यंत सर्वाधिक प्रमाणात अंमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत.

१ मार्चपासून जप्तीच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ

खर्चाचे निरीक्षण, उपलब्ध माहितीचा अचूक अर्थ लावणे आणि अंमलबजावणी संस्थांचा सक्रिय सहभाग या बाबींमध्ये जिल्हे आणि संस्थांचा नियमित पाठपुरावा आणि पुनरावलोकने यामुळं १ मार्चपासून जप्तीच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झालीय. निवडणुकांवर वेगवेगळ्या प्रमाणात प्रभाव टाकणारे अंमली पदार्थ, मद्य, मौल्यवान धातू, मोफत वस्तू तसेच रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे. यातील काही घटक थेट प्रलोभन म्हणून दिले जातात तर काही वेळा पैशाच्या रुपाने मतदारांना प्रलोभित केले जाते.

अमली पदार्थांच्या जप्तीचा वाटा सुमारे ३९५८ कोटी रुपये

आयोगाने अंमली पदार्थ आणि मानसिक उपचारांसाठीची औषधे जप्त करण्यावर विशेष भर दिला आहे. जी राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश संक्रमण प्रदेश होती, ती वाढत्या प्रमाणात उपभोग क्षेत्र बनत असल्याचे माहिती विषणात आढळून आले आहे. निवडणुकांच्या काळात अंमली पदार्थांच्या व्यापारात काळ्या पैशांचा वापर उखडून टाकण्यासाठी, त्याहून अधिक महत्त्वाचे आणि सर्वसमावेशक कारण म्हणजे तरुणांचे भविष्य वाचवण्यासाठी आणि त्याद्वारे देश वाचवण्यासाठी अंमली पदार्थांच्या विरोधात तपास यंत्रणांचे बुद्धिमत्ता आधारित अचूक सहयोगी प्रयत्न ही काळाची गरज असल्याचे मत मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी व्यक्त केले. आजवर जप्त करण्यात आलेल्या रकमेत अमली पदार्थांच्या जप्तीचा वाटा सुमारे ३९५८ कोटी रुपये आहे. म्हणजे एकूण जप्तीच्या ४५ टक्के इतका आहे.

१७ एप्रिलला १५० कोटी रुपयांचे अंमली पदार्थ जप्त दरम्यान, या लोकसभा निवडणुकांदरम्यान अमली पदार्थांच्या विरोधात लक्ष्यित कृतींची मालिका पाहायला मिळाली आहे. गुजरात, महाराष्ट्र आणि दिल्ली व्यतिरिक्त इतर राज्यांमध्येही अंमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत. १७ एप्रिल २०२४ रोजी नोएडा पोलिसांनी ग्रेटर नोएडा येथे अमली पदार्थांच्या कारखान्याचा पर्दाफाश करत १५० कोटी रुपये किमतीचा २६.७ किलो चऊचअ हा अंमली पदार्थ जप्त केला आहे. दोन परदेशी व्यक्तींना अटक करण्यात आली आहे. इतर घटकांच्या जप्ती देखील तितक्याच प्रभावी असून या वर्षातील जप्तीच्या कारवायांनी २०१९ च्या लोकसभा निवडणुकांच्या संपूर्ण जप्तींच्या आकडेवारी आणि प्रमाणाला मोठ्या अंतराने मागे टाकले आहे. सूक्ष्म आणि व्यापक नियोजन यामुळेच तपास संस्थांना हे यश प्राप्त झाले आहे.

# महाराष्ट्रात मान्सून कधी धडकणार? हवामान विभागाने दिली आनंदाची बातमी

मुंबई,१९ – महाराष्ट्रातील सर्व नागरिक सध्या उकाड्याने प्रचंड त्रस्त आहेत. खासकरुन म ुंबई, पुणे सारख्या शहरांमध्ये तर उन्हाच्या झळा असह्य झाल्या आहेत. त्यामुळे कधी एकदा उन्हाळा संपतो आणि पावसाळा सुरु होतो याची सर्वजण वाट पाहत आहेत. यादरम्यान आता सर्वांनाच प्रतिक्षा असलेल्या मान्सूनचं आज अंदमानात आगमन झालं आहे. हवामान विभागाने सर्वांना आनंदाची बातमी दिली आहे. ३१ मे रोजी मान्सून केरळच्या किनारपट्टीवर आणि ११ जूनला महाराष्ट्रात दाखल होईल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

अंदमान–निकोबार, म ालदीव आणि कोमोरीन भागात मान्सूनचे आगमन झाले आहे. हवामान विभागानं याबात माहिती दिली असून, यानुसार ३१ मे रोजी मान्सून केरळच्या किनारपट्टीवर दाखल होईल. तर महाराष्ट्रात मान्सून ११ जूनला दाखल होईल असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. तसंच यावर्षी पाऊस जवळपास १०६ टक्के होण्याचा अंदाजही वर्तवण्यात आला आहे.

पुढील २४ तासांसाठी म ुंबई शहर आणि उपनगरांसाठी अंदाज वर्तवण्यात आला आहे. आकाश अंशत: ढगाळ राहील आणि हलका ते मध्यम पाऊस पडेल असा अंदाज आहे. अंदाजानुसार, ३० ते ४० किमी ताशी वेगाने वादळी वारे आणि मेघगर्जनेसह पाऊस पडेल. शहर आणि उपनगरात उष्ण आणि दमट परिस्थिती राहण्याची शक्यता आहे. कमाल आणि किमान तापमान अनुक्रमे ३५ अंश सेल्सिअस आणि २७ अंश सेल्सिअसच्या आसपास असेल.


गेल्या आठवड्याभरापासून राज्यासह विदर्भातील बहुतांश जिल्ह्यांना अवकाळी पावसाने फटका बसल्याचं दिसून आलंय. अशातच हवामान खात्याच्या अंदाजानुसार, पुढचे पाच दिवस विदर्भातील सर्व जिल्ह्यांना अवकाळी पाऊस, विजांच्या कडकडासह ३०–४० किमी प्रति तास सोसाट्याच्या वादळी वाऱ्याचा इशारा देण्यात आलाय. हवामान विभागाने वर्तविलेल्या अंदाजानुसार विदर्भात आज पासून पुढचे पाच दिवस पुन्हा अवकाळी पावसाचा इशारा देण्यात आलाय. नागपूर, वर्धा, वाशिम, बुलढाणा वगळता उर्वरित सर्व जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. अम रावती, अकोला, यवतमाळ, चंद्रपुर, भंडारा, गोंदिया आणि गडचिरोली जिल्ह्याम ध्ये विजांच्या कडकडासह वादळी वाऱ्याचा इशारा देण्यात आलाय. तर १९ मे ते २२ मे पर्यत विदर्भातील सर्व जिल्ह्यांना नागपूर प्रादेशिक हवामान विभागाने यलो अलर्ट जारी केला आहे.



लेहमधील सिंधू संस्कृती केंद्रात मतदान अधिकारी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे (ईवीएम) आणि सार्वत्रिक निवडणूक–२०२४ च्या ५ व्या टप्प्यासाठी आवश्यक इतर निवडणूक संबंधित साहित्य घेऊन जात आहेत.








उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर

उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर–४१३५१७ जि.लातूर

फोन नं. ०२३८५–२५५२४५,२९५२४५ मो. ९७१०२५५२४५

| वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365 |
|---|---|---|---|

| १,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया |
|---|---|

मराठवाडयात एक अद्यावत नेत्र रुगणालय

भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स

| | | |
|---|---|---|
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशारे (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार |
| कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार |
| नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड)<br>डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार<br>४ था रविवार |
| काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार |

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!
अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ — डॉ.अंकिता लाहोटी (DOMS) — डॉ. दिपाली पाटील (MS)

डॉ. शितल पेद्देवाड (M.S.) — डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)


डॉ. आर.एन.लखोटिया अध्यक्ष — व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर — लॉ. प्रदिप बेद्रे सचिव



# तू काय आता नवा नाहीयेस

## गंभीरने संजू सॅमसनला स्पष्टच सांगितले, आता जरा स्वत:ला...

मुंबई,-आगामी टी-२० वर्ल्डकपसाठी संजू सॅमसनला संघात स्थान देण्यात आले आहे. संजू सॅमसनला १० वर्षांनी वर्ल्डकप संघात संधी मिळाली असून, अखेर प्रतिक्षा संपली आहे. आयपीएलमधील दमदार कामगिरीचं बक्षीस संजू सॅमसनला मिळाले आहे. तसंच डिसेंबर महिन्यात दक्षिण आफ्रिकेविरोधात एकदिवसीय सामन्यात त्याने शतक ठोकले होते. दुखापतीमधून सावरलेला ऋषभ पंत भारतीय संघाचा विकेटकिपर असणार आहे. पर्यायी विकेटकिपर म्हणून संजू सॅमसनला १५ सदस्यांच्या संघात जागा मिळाली आहे.टी-२० वर्ल्डकपमधील कामगिरीच्या आधारे संजू सॅमसनचं भविष्य ठरणार आहे. जर ते फ्लॉप झाला तर कदाचित हा त्याच्या करिअरचा शेवट असेल. पण जर त्याने चांगली कामगिरी केली जग त्याची दखल घेत कौतुक करेल असे भारतीय क्रिकेट संघाचा माजी खेळाडू गौतम गंभीरने म्हटलं आहे. संजू सॅमसनने २०१२ मध्ये गौतम गंभीरसह केकेआर संघातून आयपीएलमध्ये पदार्पण केले होते. आता संजू सॅमसनची वेळ असून, त्याने संघासाठी सामने जिंकायला हवेत असे गौतम गंभीरने म्हटले आहे. संजू सॅमसनकडे पुरेसा अनुभव असून प्रत्येकाच्या लक्षात राहणारी खेळी करण्यासाठी त्याने तो पूर्ण पणाशी लावला पाहिजे असेही त्याने सांगितले आहे.''आता तुला वर्ल्डकप संघात स्थान मिळाले आहे, त्यामुळे तुझ्याकडे संधी आहे. संधी मिळाल्यानंतर आता भारतासाठी सामने जिंकण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. तुझ्याकडे आता आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळण्याचा अनुभव आहे. तू आता नवखा नाहीयेस, ज्याला फार वाट पाहायची आहे,'' असे गंभीरने डॉीघशशवर वर सांगितले. ''तुम्ही आता आंतरराष्ट्रीय क्रिकेटचा आस्वाद घेतला आहे.तुम्ही आयपीएलमध्ये चांगली कामगिरी केली आहे, आणि आता तुम्हाला विश्वचषक खेळण्याची संधी आहे. त्यामुळे, आशा आहे की, संजू या टप्प्यावर जगाला आपण किती सक्षम आहोत हे दाखवेल. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये आणि त्यातही विश्वचषकासारख्या स्पर्धेत खेळताना संपूर्ण जग पाहतं आणि त्याची दखल घेतं,'' असं गंभीर म्हणाला आहे. आयपीएल २०२४ मध्ये राजस्थान रॉयल्सचं नेतृत्व करताना सॅमसन जबरदस्त फॉर्ममध्ये आहे. सॅमसनने १३ सामन्यांत पाच अर्धशतकांसह ५०४ धावा केल्या. तो सध्या ऑरेंज कॅपच्या यादीत विराट कोहली, ऋतुराज गायकवाड, ट्रॅव्हिस हेड, रियान पराग आणि साई सुदर्शन यांच्या मागे सहाव्या स्थानावर आहे.सॅमसन २०१२ मध्ये केकेआर संघात आला तेव्हा त्याला खेळण्याची संधी मिळाली नव्हती. पण गौतम गंभीरने आपण त्याच्यातील कौशल्य ओळखलं होतं असं सांगितलं. गंभीर म्हणाला की, ''एखादा खेळाडू कसा आहे समजून घेण्यासाठी मला ५ मिनिटं पुरेशी असतात. तुम्ही मानसिक आणि कौशल्य अशा दोन्ही बाजूंनी मोठे होत असता. जर तुम्ही एकाच ठिकाणी अडकलात तर जास्त काळ टिकू शकणार नाही. फिटनेस, पॉवर हिटिंग, किपिंग किंवा कर्णधारपद...कोणत्याही ठिकाणी त्याने चुकीचं पाऊल टाकलेलं नाही. कर्णधारपद तुम्हाला अजून चांगला खेळाडू बनवतं. त्याचं कर्णधारपद संधी मिळाल्यास वर्ल्डकपमध्येही दिसेल अशी आशा आहे''.



# मुझे बताने की जरुरत नहीं

## कोहलीचा गावस्करांना सणसणीत टोला

मुंबई-गेल्या काही दिवसांपासून टीम इंडियाचे माजी स्टार फलंदाज सुनील गावस्कर आणि सध्याचा स्टार फलंदाज विराट कोहली यांच्यात शीतयुद्ध सुरू आहे. सुनील गावस्कर यांनी विराटच्या स्ट्राईक रेटवर प्रश्न उपस्थित केल्यानंतर दोघांमध्ये जोरदार खडाजंगी झाली. दोघांनी एकमेकांवर टीका केली मात्र नाव न घेता. अशातच आता विराटने पुन्हा सुनील गावस्कर याच्यावर निशाणा साधलाय. सुनील गावस्करांनी कोहलीच्या यशाचे श्रेय धोनीला दिले होते. त्यावर विराटने खडेबोल सुनावले.काय म्हणाला विराट कोहली?

मला उत्तर देण्याची गरज नाहीये. मला माहितीये की मी मैदानावर काय करू शकतो. त्यासाठी मला कोणीही सांगण्याची गरज नाहीये की मी कसा प्लेयर आहे आणि माझी क्षमता काय आहे. सामना कसा जिंकायचा यावर मी कधी बोललो नाही. मी स्वत:हून शिकलोय. मी परिस्थिती लक्षात घेऊन, धडपडत, पराभव स्विकारून खुप काही शिकलोय. चला बाय चान्स तुम्ही सामना जिंकलात. पण इतके सामने तुम्ही अनेकदा जिंकून देताय तर हे बाय चान्स होऊ शकत नाही, असे विराट कोहली म्हणाला आहे.

तुम्हाला कोणीतरी येऊन सांगावे, की आज तू चांगला खेळलास, पण मला कोणाच्या संमतीची गरज नाहीये. मला कोणाकडूनही खात्री नकोय. मी माझ्या वडिलांकडून खूप आधीच हे शिकलोय. मला माझा खेळ महत्त्वाचा आहे. त्यांनी ते खूप आधीच मला शिकवून ठेवलेय, असेही विराट यावेळी म्हणाला आहे.सुनील गावस्कर काय म्हणाले होते?

विराट कोहलीच्या कारकीर्दीच्या सुरूवातीला जेव्हा त्याचं करियर सेट झाले नव्हते तेव्हा त्याच्या खेळीत सुधारणा होत नव्हती. सुरूवातीच्या टप्प्यात तो फारशी चांगली कामगिरी करत नव्हता तरी देखील धोनीने त्याला संधी दिली. तो फॉर्ममध्ये नसताना देखील त्याला संघात ठेवले. याच कारणामुळे आपण आज विराट कोहलीला या स्तरावर पाहतोय, असे सुनील गावस्कर यांनी म्हटले होते. त्यावर आता विराटने जोरदार उत्तर दिलेय. दरम्यान, पंजाबविरुद्धच्या सामन्यानंतर जेव्हा विराटला त्याच्या अफलातून खेळीवर प्रश्न विचारण्यात आला. त्यावेळी बोलताना विराटने स्ट्राईक रेटचा विजय काढला अन् गावस्करांना कोपरखळी मारली. इनिंगमध्ये माझा स्ट्राइक-रेट कायम राखणे माझ्यासाठी महत्त्वाचे होते, असे म्हणत विराटला हसला. त्यामुळे विराटने गावस्करांना टोला लगावला होता.



थायलंडचे बँकॉक येथे थायलंड ओपनमध्ये महिला एकेरीच्या उपांत्य फेरीदरम्यान चीनच्या वांग झियाईने परतीचा शॉट मारला.

# टी-२० वर्ल्ड कप साठी टीम इंडिया २५ तारखेला रवाना होणार, हे खेळाडू जाणार


न्यूयॉर्कला-टी२० वर्ल्ड कपला २ जूनपासून वेस्ट इंडिज आणि अमेरिकेत सुरुवात होत आहे. या स्पर्धेत यंदा २० संघांनी भाग घेतला आहे. सहभागी संघ वेस्ट इंडिज आणि अमेरिकेसाठी रवाना होऊ लागले आहेत. भारतीय क्रिकेट संघही लवकरच न्यूयॉर्कला रवाना होणारअसून याची तारीख समोर आली आहे. आधी ठरल्याप्रमाणे टीम इंडियातल्या खेळाडूंना २१ मे रोजी न्यूयॉर्कला जायचं होतं. पण आता नव्या तारखेनुसार पहिल्या टप्प्यात टीम इंडियाचे काही खेळाडू २५ मे रोजी न्यूयॉर्कला रवाना होतील. आपीएलच्या प्लेऑफमध्ये जे भारतीय खेळाडू खेळणार आहेत, ते दुसऱ्या टप्प्यात म्हणजे २७ मे रोजी रवाना होतील.

२५ मे रोजी रवाना होणार-आयपीएलच्या लीग सामन्यातच ज्या संघांचा प्रवास संपला, त्या संघातील भारतीय खेळाडू २५ मे रोजी न्यूयॉर्कला रवाना होतील. यात कर्णधार रोहित शर्मा, उपकर्णधार हार्दिक पांड्या, सूर्यकुमार यादव, जसप्रीत बुमराह, ऋषभ पंत, अर्शदीप सिंग, अक्षर पटेल आणि सपोर्ट स्टाफचा समावेश असेल.

तर यशस्वी जयस्वाल, संजू सॅमसन, शिवम दुबे, रवींद्र जडेजा, युजवेंद्र चहल आणि मोहम्मद सिराज हे आयपीएल अंतिम फेरीनंतर म्हणजे २६ मे नंतर न्यूयॉर्कला पोहोचतील.

टीम इंडिया खेळणार एक प्रॅक्टिस मॅच

टी२० वर्ल्ड कपमध्ये टीम इंडियाचा पहिला सामना ५ जून रोजी आयर्लंडशी होणार आहे. त्याआधी टीम इंडिया एक प्रॅक्टिस मॅच खेळणार आहे. १ जूनला भारत आणि बांगलादेशदरम्यान एक प्रॅक्टिस मॅच खेळवली जाईल. त्यानंतर तीन दिवस खेळाडूंना विश्रांती करता येईल. टीम इंडियाचं वेळापत्रक-टी२० वर्ल्ड कपमध्ये टीम इंडियाचा पहिला सामना ५ जूनला आयर्लंडविरुद्ध रंगणार आहे. त्यानंतर ९ जूनला भारत आणि पाकिस्तान आमने सामने असतील. १२ जूनला टीम इंडिया अमेरिकेशी तर १५ जूनला कॅनडाशी दोन हात करेल. टीम इंडियाचा ए ग्रुपमध्ये समावेश करण्यात आला आहे. टी२० वर्ल्ड कप २०२४ साठी टीम इंडिया रोहित शर्मा (कर्णधार), हार्दिक पंड्या (उप-कप्तान), यशस्वी जायसवाल, विराट कोहली, सूर्यकुमार यादव, ऋषभ पंत (विकेटकीपर), संजू सॅमसन (विकेटकीपर), शिवम दुबे, रविंद्र जडेजा, अक्षर पटेल, कुलदीप यादव, युजवेंद्र चहल, अर्शदीप सिंह, जसप्रीत बुमराह आणि मोहम्मद सिराज.राखीव खेळाडू : शुभमन गिल, रिंकू सिंह, खलील अहमद, आवेश खान



**चीनमधील शांघाय येथे ब्रेकिंग ऑलिम्पिक पात्रता मालिकेच्या बी-गर्ल्स प्री-सिलेक्शन दरम्यान स्पर्धा करताना जर्मनीची सांजा झिलवान रसूल.**

# हा दिग्गज खेळाडू होणार टीम इंडियाचा प्रशिक्षक?

मुंबई-टीम इंडियाचा नवा मुख्य प्रशिक्षक कोण असणार? याची चर्चा आता जोर धरु लागली आहे. टी२० वर्ल्ड कप २०२४ नंतर टीम इंडियाचे सध्याचे मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांचा कार्यकाळ संपणार आहे. त्यामुळे बीसीसीआयकडून नव्या कोचची नियुक्ती केली जाणार आहे आणि यासाठी अर्जही मागवण्यात आले आहेत. याची अंतिम तारीख २७ मे ठेवण्यात आली आहे. टीम इंडियाच्या नव्या मुख्य प्रशिक्षकाचा कार्यकाळ १ जुलैपासून सुरु होणार आहे. मुख्य प्रशिक्षकाच्या शर्यतीत स्टीफन फ्लेमिंग, रिकी पॉण्टिंग सारखअया परदेशी खेळाडूंचीही नावं आहेत.

दिग्गज खेळाडूचं नाव चर्चेत

टीम इंडियाच्या मुख्य प्रशिक्षकाच्या शर्यतीत दिग्गज भारतीय खेळाडूंचीही नावं आहेत. यात व्ही व्ही लक्ष्मण आणि गौतम गंभीर यांची नाव आहेत. विशेष म्हणजे राहुल द्रविडही पुन्हा प्रशिक्षकपदासाठी अर्ज करु शकतात. पण सध्या तरी यात गौतम गंभीरच्या नावाची जास्त शक्यता वर्तवली जातेय. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार बीसीसीआयने गौतम गंभीरबरोबर चर्चाही सुरु केली आहे.गंभीर बनणार टीम इंडियाचा कोच?

टीम इंडियाच्या मुख्य प्रशिक्षकपदासाठी गौतम गंभीरला संधी मिळू शकते, याची दोन कारणं आहेत.



यातलं पहिलं कारण म्हणजे गंभीरच्या मेंटॉरशीपखाली कोलकाता नाईट रायडर्सने आयपीएल २०२४ मध्ये दमदार कामगिरी केलीय. आयपीएलच्या सतराव्या हंगामातील प्ले ऑफमध्ये पोहोचणारा कोलकाता हा पहिला संघ ठरला. आयपीएल पॉईंटटेबलमध्येही कोलकाता टॉपवर होता. कोलकाता नाईट रायडर्सला गंभीर जोडल्यानंतर संघाची कामगिरी उंचावली आहे. यामुळे बीसीसीआयचे गंभीर लक्ष वेधले गेलेय.

दुसरे कारण म्हणजे आयपीएल २०२४ सुरु होण्यापूर्वी गौतम गंभीरने राजकारणातून निवृत्ती घेतली. मोठ्या काळाता राजकारणापासून दूर राहाण्याचं गंभीरने ठरवले आहे. टीम इंडियाच्या मुख्य प्रशिक्षकासाठीच गंभीरने हा निर्णय घेतल्याचे बोलले जातेय.

साडे ३ वर्षाचा कार्यकाळ

भारताला दोन वर्ल्ड कप जिंकन देण्यात गौतम गंभीरने मोलाची भूमिका बजावली आहे. त्यामुळे टीम इंडियासाठी मुख्य प्रशिक्षक म्हणून गौतम गंभीर हा चांगला पर्याय ठरु शकतो. नव्या प्रशिक्षकाचा कार्यकाळ साडे तीन वर्षाचा असणार आहे आणि येत्या १ जुलैपासून सुरु होणार आहे.गौतम गंभीरची क्रिकेट कारकिर्द

गौतम गंभीर टीम इंडियासाठी ५८ कसोटी सामने खेळला असून यात त्याने ४१५४ धावा केल्या आहेत. तर कसोटीत ९ शतके आणि १ दुहेरी शतक त्याच्या नावावर आहे. तर १४७ एकदिवसीय सामन्यात गंभीरने ५२३८ धावा केल्या असून यात ११ शतकं केलीत. २०११ च्या एकदिवसीय वर्ल्ड कप विजयात गंभीरने मोलाची भूमिका बजावली होती.



चीनचे शांघाय येथे ऑलिम्पिक पात्रता मालिका शांघाय येथे सायकलिंग बीएमएक्स फ्रीस्टाइल पुरुष पार्क फायनल दरम्यान स्पर्धा करताना ऑस्ट्रेलियाचा लोगान मार्टिन.


**CHANGE IN NAME**

I have change my name from SHATTARI A BASIT to SHATTARI ABDULBASIT ABDULHAMID hence from this decleration and will be known by this name I will use SHATTARI ABDULBASIT ABDULHAMID in future the same name will be used by my wife children and family.

**OLD NAME**

SHATTARI A BASIT

**NEW NAME**

SHATTARI ABDULBASIT ABDULHAMID

**ADDRESS**

Shattari Niwas, Behind the Post Office, At Post & Tq. Nilanga Dist. Latur (M.S.)-413521

**CHANGE IN NAME**

I have change my name from SIDHDIKABANU to SHATTARI SIDDIQUA BANU ABDUL BASIT hence from this decleration and will be known by this name I will use SHATTARI SIDDIQUA BANU ABDUL BASIT in future the same name will be used by my wife children and family.

**OLD NAME**

SIDHDIKABANU

**NEW NAME**

SHATTARI SIDDIQUA BANU ABDUL BASIT

**ADDRESS**

Kole Galli, At- Post & Tq- Nilanga Dist- Latur M.S. 413521

**CHANGE IN NAME**

I have change my name from SAYEDA MUSHTAQUE HUSSAIN to SYED MUSHTAQ HUSAIN SYED IFTEKHAR HUSAIN hence from this decleration and will be known by this name I will use SYED MUSHTAQ HUSAIN SYED IFTEKHAR HUSAIN future the same name will be used by my wife Children and family.

**OLD NAME**

SAYEDA MUSHTAQUE HUSSAIN

**NEW NAME**

SYED MUSHTAQ HUSAIN SYED IFTEKHAR HUSAIN

**ADDRESS**

Azad Nagar, Parli Vaijanath Dist. Beed (M.S.) 431515

## कल्याण बाजार

| | | |
|---|---|---|
| १४९ | ४-६ | २६८ |
| २३९ | | ७९० |
| ४३-३४ | | ६८-८६ |

## मिलन नाईट बाजार

| | | |
|---|---|---|
| १४० | ५-७ | ११५ |
| २३० | | २२३ |
| ६८-८६ | | ७२-२७ |

गोल्डन विक्री चान्सेस

प्रो. योगेश कुमार

स्पेशल जोडी, सिंगल, पत्तीसाठी संपर्क साधावा.

संपर्क 99 93 94 16 69 / 98 98 20 38 88

## नशिबाची परिक्षा

गोल्डन विक्री चान्सेस

### मिलनम डे

कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:९-५-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 130 | ७-४ | 124 | जोड | 40-67-91-82-75 |
| 248 | | 467 | | |
| 220 | | 700 | | |

### कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:०-३-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 127 | ४-० | 158 | जोड | 06-24-39-57-48 |
| 280 | | 680 | | |
| 460 | | 455 | | |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | सिंगल:७-१-४ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| १७९ | ०-७ | १४५ | जोड | 72-30-18-45-09 |
| २९८ | | २३५ | | |
| ३७७ | | ५५० | | |

संपर्क 99 75 47 98 26

**लोकमान्य अर्बन क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि. उदगीर**
**नगरपरिषद, उदगीर जि. लातूर संस्थेच्या विविध ठेवी योजना**

| कालावधी | व्याजदर |
|---|---|
| ३० ते ४५ दिवस- | ५.५०% |
| ४६ ते १८० दिवस | ७.५०% |
| १८१ ते ३६५ दिवस | ८.५०% |
| १२ महिने ते २४ महिने | ९.७५ % |
| २४ महिने ते ३६ महिने | १०.५०% |
| ३६ महिने ते ६० महिने | ११% |
| लोकमान्य मासीक व्याज प्राप्ती ठेव योजना | १०% |

**९% आवर्त ठेव द.सा.द.शे,** ०.५०% अधिक व्याजदर जेष्ठ नागरीक व महिला, दाम दुप्पट, ७८ महिने, वैयक्तिक कर्ज व इतर कर्ज १६%, सोने तारण कर्ज १४%, वेअर हाऊस कर्ज १६%, वरिल सर्व ठेवीवर नियम व अटी लागु.





# यशवंत

सोमवार दि. २० मे २०२४

पान ८

## उदगीर

कार्यालय :०२३८५-२५३१९८ मो.९८५०२२८२४०

email - yashudgirram@gmail.com



**बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.**
**शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७**

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |


मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)
दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

**उपलब्ध सुविधा**
वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमस बँकींग, मोबाईल बँकींग


# संतांना सदाचार आवडतो, संतकृपेने उदगीरचा आवाज अयोध्येत पोंहचवूया

## काशी पिठाचे जद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महाराजांच्या कृपाशीर्वादासाठी उदगिरातील बड्या नेत्यांची गुरुपिठात रीघ





उदगीर ( प्रतिनिधी) : धर्म, जातपात या पलीकडे जाऊन समाज जीवनाचा विचार करणाऱ्या संतांनी जातीनिरपेक्ष धार्मिक लोकशाहीचा पुरस्कार केला. संतांना सदाचार आवडतो. सदाचारी माणसेच संतांना प्रिय असतात. मानवी जीवनात संतकृपा, ग्रंथकृपा अगत्याची बाब असून संतांच्या कृपाशीर्वादाने उदगीरचा आवाज आपल्याला अयोध्येत पोहचवायचा आहे. देवाकडून देशाकडे हे मोदींचे बलाढ्य राष्ट्र उभारणीचे समीकरण असून पुढील अनेक दशकांसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींसारखे कणखर नेतृत्व देशाला पाहिजे, असे भावोत्कट प्रतिपादन ना. मंत्री संजय बनसोडे यांनी केले. जगद्गुरु पंचाचार्यांच्या दिव्य सान्निध्यात, मठाधीश डॉ. शंभुलिंग शिवाचार्य महाराजांच्या नेतृत्वाखाली उदगीर येथे सोमवार (ता. १३) पासून सुरू असलेल्या ५०५१ सद्भक्तांच्या अखंड शिवनाम सप्ताह व परमरहस्य पारायणाचा आजचा शेवटचा दिवस आणि भव्य कलश यात्रेचा मुख्य दिवस विविध भरगच्च धार्मिक कार्यक्रमांनी मोठ्या थाटात संपन्न झाला. हे सर्व धार्मिक कार्यक्रम वाराणसीचे जगद्गुरु श्री. श्री. श्री. १००८ डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. याप्रसंगी जगद्गुरूंचे आशीर्वाद घेऊन आपले विचार मांडताना नाम. बनसोडे यांनी प्रतिपादन केले.

पुढे बोलताना बनसोडे म्हणाले की, जनतेच्या आशीर्वादात खूप मोठी शक्ती आहे. जनतेने मला लोकसेवक म्हणून निवडून दिले म्हणून मी एवढी विकासाची कामे करु शकलो, मतदार संघासाठी अहर्निश मेहनत घेतली. आगामी विधानसभा निवडणुकीसाठी मी निश्चिंत झालो आहे. कारण यापुढे मी निवडून यावे यासाठी मायबाप जनताच मेहनत घेणार आहे. मला नजीकच्या काळात उदगीरकरांचे जिल्ह्याचे डोहाळे पूर्ण करायचे आहेत. आपणास उदगीरसह महाराष्ट्राला अव्वलस्थानी न्यायचे आहे, असेहि ते म्हणाले. दरम्यान रामेश्वर येथेजंगमवाडी मठात उभारण्यात येणाऱ्या भक्त निवासासाठी अकरा लक्ष रुपये जाहीर केले. यावेळी बसवकल्याण-सस्तापूर बंगल्याच्या धर्तीवर उदगीर येथील वीरशैव-लिंगायत भवनाची कमान उभारावी यासाठी निधी उपलब्द करुन देण्याचे जाहिर केले.

प्रास्ताविक शिव भक्ती परायण शिवराजप्पा नावंदे गुरुजी, शि. भ. प. अनिताताई हैबतपूरे यांनी केले.

आशिर्वचना काशीचे महास्वामी डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महाराज म्हणाले की, गुरुतत्व सर्वश्रेष्ठ आहे. अपार गुरुश्रद्धेतून लौकिक वैभवात भर पडते. आईवडील, ईश्वर आणि सद्गतीचे मार्ग दाखवणारे गुरु यांच्या ऋणातून मुक्त झाल्याखेरीज मोक्ष प्राप्ती होत नाही. पुढे महास्वामीजी म्हणाले की, जनतेमध्ये समरस होणारा नेता गरजेचा आहे. लोक प्रतिनिधी ज्याच्या मताने निवडणून आलेला असतो त्यांच्याशी समरस असले पाहिज्ये जनतेची सेवा केली तर जनतेचे आशिर्वाद निरंतर राहतात लोक प्रतिनिधीना राजकीय भावना बरोबर धार्मिक भावना ही असली पाहिजे .ना.संजय बनसोडे यांच्यामध्ये देव भक्ती व देशभक्ती दोन्ही आहेत.

उदारभावनेने जनतेची सेवा करणारे सर्वच क्षैत्रात तयार झाल्यास भारत जगात तिसरी अर्थिक महासत्ता होईल सर्व समाजाच्या हिताचे काम व्हावे अशी अपेक्षा व्यक्त के उदगीरच्या जनतेसाठी चार हजार कोटींची विकासकामे खेचून आणणारे संजय बनसोडे हे विकासपुरुष आहेत, प्रती मोदी आहेत. नाम. बनसोडे यांचा राष्ट्राभिमान, देशभक्ती दांडगी आहे. सर्वच क्षेत्रात संजय बनसोडे यांच्यासारखा सुपुत्र जन्मावा, असेही डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महाराज म्हणाले. राजकारणात बनसोडे यांचा दबदबा वाढावा, त्यांचा वरचष्मा कायम राहावा, असे शुभाशिर्वाद यावेळी काशीचे महास्वामी डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी दिले. डॉ.ष्ट्र संतांनी चालू केलेली परंपरा डॉ.. शंभूलिंग शिवाचार्य महाराज पुढेच ठेवत असल्याबद्दन गौरव केला.यावेळी जगद्गुरूंच्या नामघोषासह भारतमातेचा जयघोष करण्यात आला.

शंभुलिंग शिवाचार्य महाराज म्हणाले की, जगद्गुरूंच्या रुपाने काशीहून गंगा उदगीरला आली आहे. गुरुशिवाय अमृतज्ञान असाध्य आहे असे मौलिक विचार शंभुलिंग शिवाचार्य महाराज यांनी मांडले. तसेच ५० वर्षात न झालेली विकासकामे विकासपुरुष संजय बनसोडे यांनी अवघ्या ५ वर्षांत केल्याची भावना डॉ. शंभुलिंग शिवाचार्य यांनी व्यक्त केली. मठाला २ कोटी, भवनाला ९ कोटी निधी तर जंगम समाजासाठी वैयक्तिक २१ लाखांचा भक्त म्हणून निधी दिल्याचेही उदगीरच्या मठाचे मठाधीश शंभुलिंग शिवाचार्य महाराज यांनी सांगितले. यापुढिल काळात मठ संस्थिनच्या माध्यमातून शैक्षणिक उपकृम राबवण्याचा संकल्प केला.वीरशैव- लिंगायत भवन हे शैक्षणिक केंद्र बनवणार असल्याचेही स्वामीजींनी जाहीर केले. शिवकंठ शिवाचार्य नागरसुरकर यांनी आपली भूमिका नेटाने मांडताना म्हणाले की, धर्मगुरु राजकीय वर्तुळात असतील तर धर्माची अभिवृद्धी होईल, धर्माचे रक्षण होईल. मंत्री बनसोडे यांच्यामध्ये धर्म संस्काराचा मोठा गुण असल्याचेही प्रशंसनीय विधान त्यांनी केले.

माजी आमदार गोविंद केंद्रे म्हणाले, शिवनाम ही भारतीय संस्कृती. हा सोहळा उदगीरमध्ये सुसंस्काराची रुजवात करत आहे. माजी नगरपरिषद अध्यक्ष राजेश्वर निटूरे म्हणाले की, ना. संजय बनसोडे यांना अध्यात्माची उत्तम जाण आहे. धार्मिक कार्यासाठी नुसतं निधी देतो म्हणणाऱ्यांपैकी मंत्री बनसोडे नाहीत तर प्रत्यक्ष भरघोस निधी त्यांनी लिंगायत समाजास दिला आणि भव्य श्री गुरु हावगी स्वामी वीरशैव-लिंगायत भवन उदगीरमध्ये उभे राहिले.

यावेळी गुरुपिठावर शिवाचार्य महाराजांसह उद्धव महाराज हैबतपूरकर, सिद्धेश्वर उर्फ मुन्ना पाटील, सुभाष धनुरे, बाबुराव पांढरे, विमलताई गर्जे, बसवराज ब्याळे, सरपंच संघटनेचे अध्यक्ष राजकुमार बिरादार, छायाताई स्वामी, प्रा. डॉ. शाम डावळे, जयश्रीताई खेळगे आदींची उपस्थिती होती. वीरभद्र स्वामी सताळकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करुन सर्वांचे आभार मानले. महाआरतीने कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी उपस्थित हजारो भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

शिवभक्ती संगीत रविराज कडिले,हावगी पन्नासे व हरुताई सुतार यांनी सादर केले .संचलन व आभार विरभद्र स्वामी यांनी मानले.



# श्रीगुरु हावगीस्वामी मंदिर सुवर्णकलश शोमा यात्रा



उदगीर( प्रतिनिधी ) - श्रीगुरु हावगीस्वामी मंदिर सुवर्णकळसची जगदगुरु सह शिवाचार्या गणांची उदगीर शहरातून भव्य मिरवणू संपन्न झाली.

उदगीरचे आराध्य देवत सदगूरु श्री हावगीस्वामी महाराज मंदिरचा जिर्णोध्दार व मंदिराचा सुवर्ण कलशारोहण सोहळा निमित्य श्री गुरु हावगी स्वामी मठाचे मठाधिश शिवाचार्यरत्न ष.ब्र.१०८ डॉ.शंभूलिंग शिवाचार्य महाराज यांच्या नेतृत्वाखाली श्री गुरु हावगी स्वामी महाराज मठ संस्थानचे बिदर गेट येथील भव्य जागेत शिवनाम सप्ताह, परमरहस्य ग्रंथाचे पारायण संपन्न झाली .

सुवर्णकळस व काशीपीठाचे जगदगुरु,डॉ.चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामी यांची भव्य रथातातून मिरवणूक काढण्यात आली या रथात डॉ.शंभूलिंग शिवाचार्य ,सिध्दलिंग महास्वामी देवणी,शंभुलिंग शिवाचिर्य

(पान २ वर)



रक्तदान शिबिराचे उदघाटन श्री.श्री.श्री.१०८ ष.ब्र.सिध्देश्वर शिवाचार्य महाराज व म.नि.प्र.संगनबस्व महास्वामी यांचे हस्ते झाले यावेळी राम मोतीपवळे यांरक्तदान केले या प्रसंगी ब्लड बँकेचे डॉ.बस्वराज शेटकार,शिवा उप्परबावडे, महेश झुंगा स्वामी, ईश्वर समगे,,हाडोळतीकर स्वामी उपस्थित होते.